रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९| अंक २२६ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in




रायगड, गुरुवार, दि. २२ जानेवारी २०२६

# कृषीवल

किंमत ४ ₹

## आज साजरा होणार माघी गणेशोत्सव

**रायगड :** माघी गणेशोत्सव रायगड जिल्ह्यामध्ये गुरुवारी (दि.२२) ठिकठिकाणी साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्ताने २१ हून अधिक ठिकाणी मिरवणुका काढण्यात येणार आहेत. जिल्ह्यामध्ये ४६५ ठिकाणी गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करून हा उत्सव साजरा केला जाणार आहे. यावेळी जिल्ह्यामध्ये दिवसभर भजनांसह मिरवणुकांचा जल्लोष असणार आहे. माघी गणेशोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात असून, हा उत्सव साजरा करण्यासाठी भाविक सज्ज आहेत. जिल्ह्यामध्ये श्रीगणेश जयंतीनिमित्त माघी गणेशोत्सव साजरा करण्यात येणार आहे. हा उत्सव साजरा करण्यासाठी गेल्या अनेक दिवसांपासून तयारी सुरू होती. ही तयारी आता अंतिम टप्प्यात आहे.



# घंटागाड्यांचा ‘विना-नंबर’ कारभार

## जीर्ण वाहनांचा रस्त्यावर धोकादायक प्रवास; नेरळ ग्रामपंचायतीचे काम वादाच्या भोवऱ्यात

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील सर्वात मोठी व महत्त्वाची ग्रामपंचायत म्हणून ओळख असलेल्या नेरळ ग्रामपंचायतीचा कारभार सध्या वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. शहरातील स्वच्छतेसाठी वापरण्यात येणाऱ्या घंटागाड्यांची अवस्था अत्यंत दयनीय असून, अनेक गाड्या विना-नंबरप्लेट रस्त्यावर धावत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे.

नेरळ शहराचा विस्तार मोठा असल्याने कचरा व्यवस्थापनासाठी ग्रामपंचायतीकडे स्वतःच्या मालकीच्या अनेक घंटागाड्या आहेत. मात्र, यापैकी बहुतांश गाड्या पूर्णतः जीर्ण झाल्या असून, वाहनांचे सांगाडे सडलेले आहेत. गाड्या चालू असताना मोठा आवाज येत असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. सर्वात गंभीर बाब म्हणजे, यातील अनेक गाड्यांवर पासिंग नंबर अथवा नंबरप्लेटच नसल्याचे आढळून आले आहे.




> नेरळ ग्रामपंचायतीच्या घंटागाड्या पूर्णपणे जीर्ण झाल्या आहेत. या गाड्यांना नंबरप्लेट नसतानाही त्या भरवस्तीतून व मुख्य रस्त्यांवरून धावत आहेत. एखादा अपघात झाल्यास त्याची जबाबदारी प्रशासन घेणार का? आरटीओ विभागाने व संबंधित प्रशासनाने तातडीने कारवाई करावी. तसेच, गावातील स्वच्छतेचा प्रश्नही गंभीर बनला असून, गटारे तुंबल्यानंतर ती साफ करण्यासाठी नागरिकांना स्वतः ग्रामसेवकांना फोन करून विनंती करावी लागत असल्याची तक्रार आहे.
>
> – संदीप उतेकर, ग्रामस्थ

वाहतुकीचे नियम सर्वांसाठी समान असताना ग्रामपंचायतीच्या गाड्या मात्र विना-नंबर मुख्य रस्त्यांवरून बिनधास्तपणे फिरत आहेत. भविष्यात या गाड्यांमुळे एखादा गंभीर अपघात घडल्यास वाहनाची ओळख पटवणे तसेच कायदेशीर प्रक्रिया पार पाडणे मोठे आव्हान ठरणार आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित घंटागाड्यांचा विमा उतरवण्यात आला आहे का? वाहनांचे फिटनेस प्रमाणपत्र वैध आहे का? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. ग्रामपंचायत प्रशासनाकडून आरटीओ नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. दरम्यान, या प्रकरणावर प्रशासक अधिकारी तसेच ग्रामविकास अधिकारी काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## बनावट मद्य विक्री करणारे दोघे ताब्यात

**पनवेल :** राज्य उत्पादन शुल्क विभागाला खांदेश्वर रेल्वे स्टेशन परिसरात दोन इसम बनावट विदेशी मद्यची विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार त्या ठिकाणी सापळा रचण्यात आला. यावेळी खांदेश्वर रेल्वे स्टेशन परिसरात दोन संशयित इसम प्रवासी बॅगा खांद्यावर घेऊन जात असताना त्यांची तपासणी केली या बॅगमध्ये बनावट विदेशी मद्य सापडून आले. ते मद्य वसईवरून आणले असल्याचे त्यांनी सांगितले.

**जाहीर नोटीस**

माझे आशिल यांनी दिलेल्या माहितीवरून व सांगितलेवरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळिवणेत येते ते खालीलप्रमाणे-

मौजे महाळुंगे खुर्द, ता.अलिबाग, जि.रायगड येथील भूमापन क्र. व उपविभाग क्र.२४, एकुण क्षेत्र १.४४.०० (हे.आर.), आकार १.७४ (रु.पैसे) या मिळकती पैकी सुरेश गजानन म्हात्रे यांच्या मालकी व हिस्याचे क्षेत्र ०.२७.०० (हे.आर) हे जाण्या येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह माझे आशीलांनी विकत घेण्याबाबत व्यवहार ठरविलेला आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी माझे आशिलांस दिला आहे. या उपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, वारसा हक्क, वहीवाटीचे हक्क, कुळ हक्क वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार खरेदीदार यांचे वकील यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजुन माझे आशील विद्यमान मालकांबरोबर पुढील खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग,

दिनांक :-२१/०१/२०२६. (अॅड. परेश एम. घरत)

तळमजला, अशोका शॉपींग सेंटर, एस. टी. स्टॅड जवळ,
अलिबाग ता. अलिबाग, जि. रायगड
९८५०४८१२३४

# शिवनेरी किल्ल्यावर स्वच्छता अभियान

## करंजाडे येथील शिव प्रतिष्ठान, शिव मावळ्यांचा पुढाकार

**| उरण | प्रतिनिधी |**

शिव प्रतिष्ठान व शिव मावळे करंजाडे यांच्यावतीने ‘माझा किल्ला, माझी जबाबदारी’ ही संकल्पना किल्ले शिवनेरीवर मोठ्या उत्साहात पार पडली. शिव प्रतिष्ठानच्यावतीने सर्व शिव भक्तांना शिव प्रतिष्ठानचे अध्यक्ष सत्यजित पाटील यांच्यावतीने, किल्ले हे बघण्यासाठी येऊ नका किंवा किल्ल्यांवर एक पर्यटनस्थळ म्हणून न पाहता तेथे येणाऱ्या सर्व शिवभक्तांनी आपले गडकिल्ले कसे स्वच्छ राहतील याकडे लक्ष दिले पाहिजे, असे आवाहन करण्यात आले.



शिव प्रतिष्ठान व शिव मावळ्यांनी हे स्वच्छता अभियान राबविले असून, या उपक्रमाचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे. अशा प्रकारचे अभियान सर्व संस्थांनी राबविले पाहिजे, तरच गडकिल्ले स्वच्छ होतील, असा विचार विविध सामाजिक संस्था संघटनानी व्यक्त केला आहे. या स्वच्छता मोहिमेत शिवप्रतिष्ठानचे अध्यक्ष सत्यजित पाटील, सुनील अंबावडे, अविनाश ठोसर, प्रशांत शेट्टी, सुरेश बारवे, संदीप पाटील, राकेश कुसले, अमर कुसले, दिनेश तेमगिरे, शंतनू कदम, रोहन शिर्के, योगेश कुलुल, सिद्धांत अंबावडे, दीपक चौधरी, अक्षय मोरे, ओमकार, अथर्व आदी मान्यवरांनी भाग घेतला.



# गटविकास अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली सभा पार

**| नवीन पनवेल | प्रतिनिधी |**

स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान हे दि.३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी या दरम्यान राबविण्याकरिता गटविकास अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तालुका समन्वय समितीची सभा सोमवारी (दि.१९) घेण्यात आली. या सभेमध्ये असे ठरले की, दि.२६ जानेवारी रोजी कुष्ठरोगाविषयी जनजागृती करायची आहे, प्रत्येक शाळेमध्ये कुष्ठरोगाबाबत माहिती देऊन प्रतिज्ञा वाचन करायचे आहे. तसेच, प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसभेच्या वेळी कुष्ठरोगाबाबत माहिती देऊन प्रतिज्ञाचे वाचन करायचे आहे. त्यानंतर दि. ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी या दरम्यान तालुक्यामध्ये शाळेमध्ये निबंध स्पर्धा, नाट्यकला सादर करणे, शाळेतील मुलांची गावात प्रभात फेरी काढून जनजागृती करणे, तसेच कुष्ठरोगाबाबत समाजात असलेले गैरसमज दूर करायचे आहेत. हे अभियान तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अपर्णा खेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणार आहे.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. सुरेन्द्र धनाजी शिंदे, रा. बी २-११, रूम नं.५, सेक्टर १६, वाशी, बँक ऑफ इंडियाच्या समोर, नवी मुंबई ४००७०५, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे धोत्रे, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत.**

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ४९/४/अ | ०.८०.००<br>पो.ख. ०.१०.०० | ०.६४ | श्रीमती भागुबाई राम उघडा. |
| | एकुण ०.९०.०० | | |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या ०७ (सात) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत सही/-

दिनांक :- २२/०१/२०२६. **अॅड. उषा जे. कांबळे.**

कर्जत, ''पुष्प विमल'' निवास,
नानामास्तरनगर, मुद्रे .
मो. नं. ७३८५००४८०६.

# ‘स्पर्श’ कुष्ठरोग जनजागृती अभियान

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

कुष्ठरोगाबाबत समाजातील गैरसमज दूर करून रुग्णांप्रति सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करण्याच्या उद्देशाने ‘स्पर्श’ कुष्ठरोग जनजागृती अभियान दि.३० ते १३ फेब्रुवारीदरम्यान विविध उपक्रमांद्वारे राबविण्यात येणार आहे. ‘भेदभाव समाप्त करूया, सन्मानाची वागणूक देऊया’ हे यावर्षीच्या अभियानाचे घोषवाक्य आहे.

या अभियानांतर्गत जिल्हा आरोग्य विभागाच्यावतीने प्रभात फेरी, जनजागृती रॅली, शाळा व महाविद्यालयांमध्ये मार्गदर्शन सत्रे, पोस्टर व घोषवाक्य प्रदर्शन, आरोग्य शिबिरे, तसेच ग्रामसभा व सार्वजनिक ठिकाणी कुष्ठरोगाबाबत माहितीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. कुष्ठरोग हा पूर्णपणे बरा होणारा आजार असून वेळेवर निदान व उपचार केल्यास अपंगत्व टाळता येते, हा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे. तसेच कुष्ठरोगग्रस्त व्यक्तीविषयी असलेला सामाजिक भेदभाव व कलंक दूर करून त्यांना सन्मानाने वागणूक देण्याचे आवाहन या अभियानाद्वारे करण्यात येणार आहे.

कुष्ठरोग हा मायक्रोबॅक्टेरियम लेप्रे नावाच्या जंतूमुळे होतो. कुष्ठरोगाची लक्षणे हळूहळू दिसून येतात. त्यामुळे ती वेळीच ओळखणे महत्त्वाचे आहे. कोणतेही लक्षण आढळल्यास तत्काळ जवळच्या आरोग्य केंद्रात तपासणी करून घ्यावी, मोफत उपचारांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी किसन जवळे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निशिकांत पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी व सहाय्यक संचालक कुष्ठरोग डॉ. प्राची नेहूलकर यांनी केले आहे. या अभियानामुळे समाजात जागरुकता वाढून कुष्ठरोग निर्मूलनास गती मिळेल, असा विश्वास आरोग्य विभागाने व्यक्त केला आहे.

**जाहिर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे चौल ता. अलिबाग जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक अनंत शांताराम पाटील, रा. मु. पो. चौल बेलाई ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या नांवे असलेली खुद्द मालकी हक्काची व त्यांचे ताबे कब्जातील व वहिवाटीतील खालील वर्णन केलेली मिळकत माझे स्नेही यांनी कायमस्वरूपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार(रू.पै.) |
|---|---|---|---|
| चौल ता. अलिबाग जि. रायगड | १६०७ | ०-५८-२०<br>पो.ख ०-०४-००<br>एकूण क्षेत्र ०-६२-२० | ७.४२ |

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहु मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासुन सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे, असे गृहित धरून माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

तारीख :- २२/०१/२०२६

सही/-
**श्री. किशोर वामन तेलंगे**
पत्ता : श्री साई कन्सल्टन्सी, दुय्यम निबंधक अलिबाग
कार्यालया समोर गाळा क्र.३, ता.अलिबाग, जि.रायगड
मो. नं. ९८२२३४८१७३, ८८०५३२८६४६

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

**निविदा सुचना**

**विषय : पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि. पेण या इमारतीवर सौर लाईट लावणे.**

सदर कामासाठी सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा दिनांक ३०/०१/२०२६ पर्यंत पेण प्राथमिक शिक्षक सह. पतपेढी कार्यालय पेण येथे सायं ३.०० वाजेपर्यंत पोहचतील अशा बेताने पाठवाव्यात.

| अ.क्र. | तपशिल | कि. वॅट | इसारा | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि. पेण येथे पहिला मजला इमारतीवर सौर लाईट लावणे | ५ किलो वॅट | ५,०००/- | ३ महिने |
| २ | सौर लाईट लावणे तळमजला व दुसरा मजला | ३ किलो वॅट | | ३ महिने |

**अटी व शर्ती**

१) सोलर लाईट कंपनीकडून परफॉरमन्स वॉरंटी किमान २५ वर्षाची असावी.
२) सोलर लाईट बसविण्यासाठी स्ट्रक्चर हॉट डीप चे असावे .
३) सोलर लाईट बसविणाऱ्या कंपनीचा किमान ५ वर्षाचा अनुभव असावा.
४) सोलर लाईट बसविण्यासाठी पेमेंट अकाउंट वर केले जाईल. बील जी. एस टी असावे
५) उच्च दर्जाचे utl कंपनीचे सोलर पॅनल असावे.

**श्री. नितिन वसंत वर्तक** – सचिव
**श्री. विनोद हसूराम जोशी** – मानद सचिव
**श्री. दत्ताराम अर्जून शिर्के** – व्हा. चेअरमन
**श्री. महेंद्र गुणाजी शिर्के** – चेअरमन

पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि. पेण

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. सुरेन्द्र धनाजी शिंदे, रा. बी २-११, रूम नं.५, सेक्टर १६, वाशी, बँक ऑफ इंडियाच्या समोर, नवी मुंबई ४००७०५, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे मोग्रज, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत.**

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ४६/१/क | १.२०.००<br>पो.ख. ०.२२.०० | १.०० | श्री.धाऊ आलु शिंगवा वगैरे |
| | एकुण १.४२.०० | | |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानीशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या ०७ (सात) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे माणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत सही/-

दिनांक :- २२/०१/२०२६. **अॅड. उषा जे. कांबळे.**

कर्जत, ''पुष्प विमल'' निवास,
नानामास्तरनगर, मुद्रे .
मो. नं. ७३८५००४८०६.

## हरिनाम सप्ताहाचा रौप्य महोत्सव



**| पाताळगंगा | प्रतिनिधी |**

नढाळ गावाला वारकरी संप्रदायाचा वारसा लाभल्याने या गावात गेल्या अनेक वर्षांपासून अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. या सप्ताहाच्या माध्यमातून समाज प्रबोधनाचे कार्य ग्रामस्थकरीत असतात. यावर्षी २५ वर्षे पूर्ण झाल्याने रौप्य महोत्सवाचे औचित्य साधत विविध कार्यक्रम पार पडल्याने गावात हरिनामाच्या गजराने नवचैतन्य निर्माण झाले होते. या सोहळ्यात संतोष सते (भाताण), समीर पवार (चावणे) यांची प्रवचन रुपी सेवा पार पडली. तर, संजय बारस्कर (खरसुंडी), दत्तात्रय भोर (संगमनेर), पुंडलिक देहुकर (देहू), तर काल्याचे कीर्तन गुरुपुत्र चैतन्य खंडागळे, श्रीनाथ आश्रम चौक यांची कीर्तन रुपी सेवा संपन्न झाली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हेमंत दळवी यांनी केले.

## वाहतूक पोलिसांची चालकांवर कारवाई

**अलिबाग :** वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १९७ चालकांविरोधात वाहतूक पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत २ लाख २४ हजार ९०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. हेलमेट नसणे, वाहन वेगात चालवणे, जादा वाहतूक प्रवास करणे अशा वेगवेगळ्या कारणांवरून वाहतूक पोलिसांनी मंगळवारी कारवाई केली.

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील वर्णनाच्या जमिन मिळकती बाबत विद्यमान मालक यांचेबरोबर चर्चा/वाटाघाटी आमचे अशील करत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्र.व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| वरसोली ता. अलिबाग | १६६/१९०/१९६/१९७/१९८/८४ | ४.५०.०० | ४५.०० |

वर वर्णन जमिन मिळकत सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकती या विद्यमान मालक १) साक्षी भूषण कवटे यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीत असल्याचा व कायदेशिर हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशीलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील सदरबाबत कोणताही व्यवहार ठरविणेपुर्वी खातरजमा करण्यासाठी हि जाहीर नोटीस देण्यात येत आहे. तरी या जाहीर नोटीसने सर्वांना असे कळविण्यात येते की, वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध य निजोखमी मालकी हक्कांची आहेत व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असून ही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या लाभांत सोडून दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशील विद्यमान मालकांबरोबर व्यवहार ठरवतील व त्यानंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण - अलिबाग

दिनांक २१/०१/२०२६ **अॅड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**

मोबा. नं. ९९२२७०७०१२

लक्ष्मी नारायण, पहिला मजला,
गाळा नं. ७ व ८, ब्राम्हण आळी, राम मंदिर
समोर, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२२०१

**जाहीर नोटीस**

**तारीख २२ जानेवारी २०२६**

तमाम लोकांस या जाहीर नोटिशीने कळविण्यात येत आहे कि १) आदिती मिलिंद सावंत, २) प्रशाली सचिन सावंत, ३) सुनिता प्रभाकर सावंत, ४) मिलींद प्रभाकर सावंत, ५) नितीन प्रभाकर सावंत, आणि ६) सचिन प्रभाकर सावंत रा. मु. हुमगाव, तालुका कर्जत, जिल्हा रायगड (यास यापुढे ''मूळमालक'' असा उल्लेख केला आहे) यांची मौजे हुमगाव, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची सामायिक मालकीची ''शेतजमीन मिळकत'' माझे अशील सौं मेघा अमित कसबे राहणार घाटकोपर मुंबई हे कायमस्वरूपी खरेदी करण्याचा विचार करत आहे. सदर शेतजमीन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

**शेत जमीन मिळकतीचा तपशील**
**मौजे हुमगाव, तालुका कर्जत, जिल्हा रायगड**

| गट/भूमापन क्रमांक व उपविभाग | लागवड योग्य क्षेत्र | क्षेत्र हे. आर. पॉ. | भू-धारणा पद्धती |
|---|---|---|---|
| सर्वे नंबर २३/६ (जुना सर्वे नंबर १२६/६) | जिरायत<br>वरकस<br>पोटखराब क्षेत्र | ०-१९-१०<br>०-०८-२०<br>०-०३-३० | भोगवटादार वर्ग १ |
| | एकूण | ०-३०-६० | |

कोणाही व्यक्ती किंवा अनेक व्यक्ती कंपनी कार्यालय यांचा सदर शेतजमीन किंवा त्यावर त्याच्या भागावर विक्री, गहाणवट, लिअन, भेट किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क असेल तर त्याच्या पुष्ट्यर्थ त्यांनी अशा हक्काबाबत/हरकतीबाबत सूचना त्यात हक्क/हरकतीचा स्वरूप यांची माहिती अन्य तपशीलसह कि जो पुरावा म्हणून पुरेशी ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली सही करणाऱ्या कडे त्यांच्या कार्यालयात हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत सादर करावी आणि जर तसे केले नाही तर असे गृहीत धरण्यात येईल कि, सदर शेतजमीन हि सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कापासून आणि अधिकारापासून किंवा अन्य प्रकारची या बंधनातून मुक्त असेल आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल आणि माझे अशील कोणतेही हक्क, हरकती आल्याच तर त्याचा विचार न करता सदर शेतजमीन खरेदी करण्याचा दृष्टीने दिलेली मुदत संपल्यानंतर कार्यवाही करेल.

निकिता शेलार ९८७०७१४५८३
Email id :- nikitashelar001@gmail.com
वकील उच्च न्यायालय
ऑफिस रूम नंबर ००४ पी -९ नुपूर पॅलेस
शीतल नगर मीरा रोड ईस्ट डिस्ट्रिक्ट ठाणे ४०११०७

**पनवेल महानगरपालिका**
**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, पनवेल महानगरपालिका पनवेल | ०१ नारळ, ०१ कडूनिम, व ०१ फणस एकूण ०३ झाडे तोडणी व ०२ जांभूळ, ०१ पाम, ०४ पेरू, ०६ नारळ, ०१ फणस ०२ कनेरी (फुलझाड) व ०३ सुपारी एकूण १९ झाडे पुनर्रोपण अशी एकूण २२ झाडे | पनवेल महानगरपालिका, हद्दीतील प्लॉट नं. जी १२० ते ते १२३, सेक्टर-१२, खारघर, ता. पनवेल, जि. रायगड येथे ०१ नारळ, ०१ कडूनिम व ०१ फणस एकूण ०३ झाडे तोडणी व ०२ जांभूळ, ०१ पाम, ०४ पेरू, ०६ नारळ, ०१ फणस, ०२ कनेरी (फुलझाड) व ०३ सुपारी एकूण १९ झाडे पुनर्रोपण अशी एकूण २२ झाडे हे दैनिक बाजार बांधकाम करणेस बाधित होत आहेत. |
| २ | कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, पनवेल महानगरपालिका, पनवेल | ०१ रेन ट्री, ०४ जंगली ०१ गुलमोहर, ०१ शेवगा, ०१ निलगिरी ०१ कदंब, ०३ नारळ व ०१ आंबा अशी एकूण १३ झाडे तोडणे | पनवेल महानगरपालिका हद्दीतील १) प्लॉट नं. ७४ सेक्टर-११, खारघर येथील ०१ रेन ट्री झाड व २) प्लॉट नं. ए २४ डी, सेक्टर-१२, खारघर येथील ०२ जंगली, ०१ गुलमोहर, ०१ शेवगा, ०१ निलगिरी व ०२ नारळ एकूण ०७ झाडे आणि ३) प्लॉट नं. सी ४६ ए, सेक्टर-१२, खारघर येथे ०१ कदंब, ०१ आंबा, ०२ जंगली व ०१ नारळ एकूण ०५ झाडे अशी एकूण १३ झाडे हे दैनिक बाजार बांधकाम करणेस बाधित होत आहेत. |
| ३ | कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, पनवेल महानगरपालिका, पनवेल | ०१ जंगली, ०१ आंबा ०१ वड, ०१ बदाम व ०१ उंबर अशी एकूण ०५ झाडे तोडणे | पनवेल महानगरपालिका हद्दीतील १) प्लॉट नं. १६१, सेक्टर-२१ खारघर येथील ०१ जंगली व ०१ आंबा एकूण ०२ झाडे व २) प्लॉट नं. १० बी, सेक्टर-०६ खारघर येथील ०१ वड व ०१ बदाम एकूण ०२ झाडे आणि ३) प्लॉट नं. एफ/४३ ए, सेक्टर-१२ खारघर येथील ०१ उंबर झाड अशी एकूण ०५ झाडे हे दैनिक बाजार बांधकाम करणेस बाधित होत आहेत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची/ पुनर्रोपण करण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणी करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

सही/-
**उपायुक्त**
तथा वृक्ष अधिकारी
पनवेल महानगरपालिका

जा.क्र.PMC-PARK/७३१/२०२५-PTAD

कृषीवल
रायगड, गुरुवार, दि. २२ जानेवारी २०२६
किंमत ४ ₹

## वाहनाच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**नवीन पनवेल :** कळंबोली रोडपाली सेक्टर १७ येथील अथर्व खेडकर (२२) हा दि.१७ जानेवारी रोजी कळंबोली ते पुणे असा मित्राच्या दुचाकीवरून प्रवास करत होता. तो रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास जुना मुंबई-पुणे महामार्गावरील रबारवई पुलाच्या शंभर मीटर अंतरावर तो आला असताना एका वाहनाने त्याच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या धडकेत अथर्व गंभीर जखमी झाला. त्याला उपचारासाठी कामोठे येथील एमजीएम हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या अपघाताप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## १४ लाखांची ऑनलाईन फसवणूक

**नवीन पनवेल :** डिजिटल अरेस्टच्या नावाने कायद्याचा धाक दाखवून खोटी माहिती सांगितली. तसेच, व्हिडिओ कॉलनी नजर कैदेत ठेवून पैसे तपासणीच्या नावाने १४ लाख रुपयांचे ऑनलाईन फसवणूक केली. या प्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ६५ वर्षीय ब्रिजलाल बरनवाल हे सेक्टर ३६ कामोठे येथे राहत असून त्यांना डिजिटल अरेस्टच्या नावाखाली कायद्याचा धाक दाखवण्यात आला. तसेच, त्यांना खोटी माहिती सांगून दि.२६ नोव्हेंबर ते ५ डिसेंबरपर्यंत व्हिडिओ कॉलनी नजर कैदेत ठेवले. यादरम्यान, त्यांच्याकडून पैसे तपासणीच्या नावाने १४ लाख रु. घेऊन फसवणूक केली.

### वे|ध|क

## खारघर येथील विवाहितेचा छळ

**पनवेल :** खारघर येथील सेक्टर-१६ मधील सोसायटीत राहणाऱ्या ३२ वर्षीय महिलेचे लग्न झाल्यानंतर पतीसह सासू-सासरे आणि नणंद यांच्याकडून विविध मागण्यांवरून छळवणूक होत होती. त्यात मोटार खरेदी करण्यासाठी पैशांची मागणी, फसवणूक, अनैसर्गिक संबंधांसाठी आणि गर्भपात करण्यास दबाव, सोन्याच्या दागिन्याचा स्वत:साठी वापर, काही खासगी चित्रफीत जाहीर करण्याची भीती आणि महिलेसह तिच्या मुलाला वाऱ्यावर सोडण्यात येणार असल्याची धमकी देण्यात येत होती.

## पाटा डोक्यात घालून पत्नीला मारहाण

**नवीन पनवेल :** महादेव बनकर हे कामावरून घरी आल्यानंतर त्यांचे पत्नीसोबत भांडण झाले. यावेळी पतीने पत्नीला वॉकर स्टिकने मारहाण केली. त्यानंतर केसाला पकडून फोडल्याने पत्नीचा तोल जाऊन त्या खाली पडल्या. यावेळी पतीने लाकडी पाटा डोक्यात मारला. त्यात त्या गंभीर जखमी झाल्या. त्यांच्यावर तळोजा एमआयडीसी येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी पती महादेव कैलास बनकर यांच्या विरोधात मंगळवारी (दि.२०) तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अपघातात पोलीस हवालदार जखमी

**नवीन पनवेल :** पोलीस हवालदार बंडू भिसे हे कळंबोली येथे राहत असून ते नवी मुंबई पोलीस दलात नोकरी करतात. ते रबाळे एमआयडीसी येथे काम करत असून, शनिवारी (दि.१७)ते रात्रपाळीवर होते. त्यावेळी ते रात्री ८ वाजताच्या सुमारास पुरुषार्थ ब्रिज येथे दुचाकीवरून पोहोचले. त्यावेळी त्यांच्या पाठीमागून आलेल्या काळया रंगाच्या क्रेटा कारने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. त्यात त्यांच्या खांद्याला गंभीर दुखापत झाली आहे. हा अपघात झाल्यानंतर कारचालकाने तेथून पळ काढला.

## जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी
# 322 अर्ज दाखल

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

**रायगड जिल्हा परिषदेच्या ५९ व पंचायत समितीच्या ११८ जागांसाठी उमेदवारी अर्ज भरण्यास शुक्रवारपासून सुरुवात झाली. अर्ज भरण्याच्या मुदतीमधील शेवटच्या दोन दिवसांपासून अलिबागसह जिल्हयातील अनेक उपविभागीय अधिकारी कार्यालयात उमेदवारी अर्ज भरण्यासाठी उमेदवारांनी गर्दी केली. अर्ज भरण्याची लगबग प्रचंड दिसून आली. यावेळी एक वेगळा उत्साह कार्यकर्त्यांमध्ये दिसून आला. जिल्ह्यात आतापर्यंत तीनशेहून अधिक उमेदवारी अर्ज दाखल झाल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.**



रायगड जिल्हा परिषदेच्या निवडणूकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्यासाठी सोमवारपासून गर्दी दिसून आली. तहसील व उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आपल्या उमेदवारांना पाठींबा दर्शविण्यासाठी तसेच शुभेच्छा देण्यासाठी कार्यकर्त्यांचा एक वेगळा जल्लोष पहावयास मिळाला.

रायगड जिल्ह्यामध्ये सोमवारी (दि.१९) २२ अर्ज दाखल करण्यात आले. दि.२१ जानेवारी ही अर्ज भरण्याची शेवटची मुदत असल्याने मंगळवार व बुधवारी अर्ज भरण्यासाठी अलोट गर्दी उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर झाली. आपला उमेदवारी अर्ज लवकरात लवकर भरण्यात यावा, यासाठी उमेदवारांची लगबग सुरु होती. वेळ संपत आला, तरी अर्ज भरण्याची प्रक्रीया सुरु होती. त्यामुळे प्रशासनाकडून उमेदवारांना टोकन नंबर देण्यात आले होते. नंबर कधी लागणार याकडे उमेदवारांचे डोळे लागून राहिले होते. सायंकाळी सहा वाजले, तरी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रीया सुरुच होती. जिल्ह्यामध्ये मंगळवारी (दि.२०) एका दिवसात दोनशेहून अधिक उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. त्यानंतर बुधवारी (दि.२१) शेवटच्या दिवशीही १५० हून अधिक अर्ज दाखल झाल्याची माहिती समोर येत आहे. साधारणपणे जिल्ह्यात शेवटच्या दिवसांपर्यंत ३४४ हून अधिक उमेदवारी अर्ज दाखल झाल्याची माहिती समोर येत आहे.

### आज होणार अर्जांची छाननी

रायगड जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर तीनशेहून अधिक उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. या उमेदवारी अर्ज भरणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने हे अर्ज स्विकारताना प्रशासनाची दमछाक उडाली. अनेकांना टोकन देण्याची वेळ प्रशासनावर आली. दाखल झालेल्या उमेदवारी अर्जाची छाननी गुरुवारी (दि.२२) सकाळी ११ ते ३ यावेळेत होणार आहे. त्यानंतर चित्र स्पष्ट होणार आहे. तसेच, मंगळवारी (दि.२७) सकाळी ११ ते ३ यावेळेत माघार घेण्याची प्रक्रीया राबविली जाणार आहे. त्यानंतर अंतिम उमेदवार जाहीर केले जाणार आहेत.

### प्रशासनाचा कारभार संथगतीने

अलिबाग तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ७ व पंचायत समितीच्या १४ जागांसाठी शुक्रवारपासून उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात झाली. मंगळवारी (दि.२०) सकाळपासून ८९ अर्ज दाखल करण्यात आले. मात्र, प्रशासनाचा कारभार संथगतीने असल्याचे दिसून आले. तासन्तास उमेदवारांना अर्ज भरण्यासाठी तहसील कार्यालयाच्या आवारात उभे राहवे लागले. ज्या ठिकाणी पाणी व नाश्त्याची व्यवस्था करण्याचे कक्ष होते, त्याठिकाणी कोणतीच व्यवस्था दिसून आली नाही. त्यामुळे काही उमेदवारांना अन्न पाण्याविना राहण्याची वेळ आली. उमेदवारी अर्ज स्विकारण्यासाठी विलंब लागला. त्यामुळे त्याच दिवशी उमेदवारी अर्जाची आकडेवारीदेखील जिल्हा प्रशासनापर्यंत पोहचली नाही, त्यासाठी दुसरा दिवस उजाडला.

### बुधवारी ७६ अर्ज दाखल

रायगड जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या एकूण २१ जागांसाठी निवडणूक होणार आहे. उमेदवारी अर्ज भरण्याची बुधवारी (दि.२१) शेवटची मुदत होती. त्यामुळे त्यादिवशीदेखील अर्ज भरण्यासाठी गर्दी झाली होती. अर्ज भरण्यासाठी मुदत कमी असल्याचा त्रास अनेक उमेदवारांना झाला. संध्याकाळी ६ वाजून गेले तरी अर्ज भरण्याची प्रक्रीया सुरुच होती. सायंकाळी ६ वाजेपर्यंत ५० अर्ज स्विकारण्यात आले होते. त्यानंतर उर्वरित २६ अर्ज स्विकारण्यासाठी रात्री ८ वाजले. त्यामुळे अलिबागमध्ये बुधवारी ७६ अर्ज दाखल झाल्याची माहिती समोर येत आहे.

## रवीशेठ पाटील समर्थकांचा
# खासदार गटाविरोधात बंडाचा इशारा

**| पेण | प्रतिनिधी |**

पेण तालुक्यात खा. धैर्यशील पाटील आणि आ. रवीशेठ पाटील हे जरी एकत्र आले असले, तरी अंतर्गत गटबाजी अद्याप संपलेली नसल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. आ. रवीशेठ पाटील यांच्या समर्थकांनी थेट खासदार गटाविरोधात बंडाचे निशाण हाती घेतल्याने पेणमधील राजकीय वातावरण तापले आहे. वडखळ गणासाठी उमेदवारीवरून सुरू झालेल्या वादातून हे बंड उफाळून आले आहे. या गणासाठी भाजपचे उपजिल्हाध्यक्ष मिलिंद पाटील आणि प्रभाकर म्हात्रे ऊर्फ हरी ओम हे दोघेही इच्छुक होते. मागील निवडणुकीत जि.पचे सदस्य असलेले प्रभाकर म्हात्रे हे खासदार गटाचे, तर जिल्हा उपाध्यक्ष मिलिंद पाटील हे आमदार गटाचे मानले जात होते. मात्र, उमेदवारी प्रभाकर म्हात्रे यांना मिळाल्याने नाराज झालेल्या मिलिंद पाटील यांनी आपल्या पक्ष पदाचा तसेच भाजपचा राजीनामा देत शिवसेना (शिंदे गट) कडून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाला आ. रवीशेठ पाटील यांचे खंदे समर्थक व्ही.बी. पाटील, गोरख पाटील, राजेश मोकल यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी जाहीर पाठिंबा दिला आहे. त्यामुळे हे बंड केवळ वैयक्तिक नाराजीपुरते मर्यादित न राहता संघटित स्वरूप धारण करत असल्याचे चित्र आहे.

दरम्यान, पेणमध्ये दबक्या आवाजात अशी चर्चा सुरू आहे की, खा. धैर्यशील पाटील यांच्या विरोधातच आमदार गटातील समर्थक मिलिंद पाटील यांच्या पाठीशी उभे आहेत. तसेच, मिलिंद पाटील यांनी धनुष्यबाण हाती घेण्यामागे 'वैकुंठ निवासाचा' मूक पाठिंबा असल्याचीही चर्चा जोर धरू लागली आहे. आमदार आणि खासदारांच्या गटबाजीच्या राजकारणात मात्र सर्वसामान्य कार्यकर्ते अडकले असल्याची भावना आता उघडपणे व्यक्त होत आहे. आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हे बंड पेणच्या राजकारणात कोणते वळण घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## खोपोलीत शेकापची 'एकला चलो'ची भूमिका




**| खोपोली | प्रतिनिधी |**

नगरपालिकांच्या निवडणुकीत शेतकरी कामगार पक्ष, राष्ट्रवादी (अजित पवार) आणि शिवसेना (उद्धव ठाकरे) या पक्षांनी एकत्रित परिवर्तन विकास आघाडी करून घवघवीत यश मिळाले होते. मात्र, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत शेकापने परिवर्तन विकास आघाडीतून बाहेर पडत 'एकला चलो'ची भूमिका घेतली आहे. दरम्यान, शेकापने २ जिल्हा परिषद गट आणि ५ पंचायत समिती गणातून •> पान ५ वर

## भरत गोगावलेंना ध्वज फडकविण्याचा मान

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या अलिबागमधील प्रजासत्ताक दिनाच्या शासकीय ध्वज फडकविण्याचा मान रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांना देण्यात येणार आहे. त्याबाबत मंत्रालयाच्या सामान्य प्रशासन विभागाने परिपत्रक काढले आहे. रायगडचे पालकमंत्रीपद अद्यापही रिक्त असताना अलिबागमधील प्रजासत्ताक दिनाचा कार्यक्रमात ध्वज कोण फडकविणार, यावरून शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मागील काही दिवसांपासून रस्सीखेच सुरू होती. गतवर्षी प्रजासत्ताक दिन आणि स्वातंत्र्यदिनी राष्ट्रवादीच्या मंत्री आदिती तटकरे •> पान ५ वर

## कर्जत तालुक्यातून लाल मातीची वाहतूक
### पकडलेल्या गाड्या सोडल्याने चौकशीची मागणी

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील लाल मातीवर नवी मुंबई व मुंबईमधील बगीचे आणि मैदाने हिरवेगार होत आहेत. मात्र, त्या लाल मातीची विनापरवाना वाहतूक कर्जत तालुक्यातून केली जात असल्याचे उघड झाले आहे. महसूल विभागाने मंगळवारी (दि.२०) रात्रीच्या सुमारास कारवाई करताना दोन हायवा गाड्या पकडल्या. मात्र, त्या गाड्या रात्रीच्या अंधारात सोडण्यात आल्याने महसूल खात्याने केलेल्या कारवाईबद्दल साशंकता निर्माण झाली आहे. मुरबाड तालुक्यात माती उत्खनन सुरू असल्याने महसूल विभाग कशाप्रकारे कारवाईचा बडगा उगारणार, याकडे लक्ष लागले आहे.



कर्जत तालुक्यातील आदिवासी भागातील जमिनीमध्ये असलेल्या लाल मातीचे कुतूहल शहरवासियांना आहे. लाल माती ही रोपवाटिका आणि गार्डन तसेच मैदानासाठी महत्त्वाची समजली जाते. त्याच लाल मातीवर डोळा ठेवून माती उत्खनन आणि मातीची चोरटी वाहतूक सुरू आहे. गेल्या तीन-चार वर्षांपासून हा गोरख धंदा सुरू असून, मागील वर्षी एप्रिल महिन्यात कर्जत •> पान ५ वर




## राजा ठाकूर यांना उत्स्फुर्त प्रतिसाद
### आवास जिल्हा परिषद मतदार संघातून उमेदवारी अर्ज दाखल

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

अलिबाग तालुक्यातील आवास येथील जिल्हा परिषद मतदार संघातून महाविकास आघाडीतील शेकाप व काँग्रेसचे उमेदवार राजा भाऊ ठाकूर यांनी मंगळवारी उमेदवारी अर्ज भरला. त्यांनी अर्ज दाखल भरण्याची तयारी दाखविल्यापासून मतदारांकडून त्यांना प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे या निवडणूकीत ते भरघोस मतांनी निवडून येतील, असा विश्वास कार्यकर्त्यांकडून व्यक्त केला जात आहे.



रायगड जिल्हा परिषदेवर गेल्या चार वर्षांपासून प्रशासकीय राजवट आहे. मात्र, या मतदार संघात विकासकामे करण्यास •> पान ५ वर

## 'नाईट महाराष्ट्र'चा पर्दाफाश

**| म्हसळा | प्रतिनिधी |**

म्हसळा शहरातील कुंभार आळी रोड परिसरात खुलेआम सुरू असलेल्या 'नाईट महाराष्ट्र' मटका जुगार अड्ड्यावर सोमवारी (दि.१९) सायंकाळच्या सुमारास म्हसळा पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी रोख रकमेसह जुगाराचे साहित्य जप्त केले असून, दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, म्हसळा येथील कुंभार आळीकडे जाणाऱ्या रस्त्यावर रंजित बारटक्के यांच्या •> पान ५ वर

### वातानुकूलित यंत्र बसविण्यास मनाई | अधिकाऱ्यांकडून आदेशाचे उल्लंघन
# अधिकारी थंडाव्यात, जनता उकाड्यात

**| रसायनी | प्रतिनिधी |**

शासकीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या दालनात वातानुकूलित यंत्र बसवू नयेत, असे स्पष्ट आदेश महाराष्ट्र शासनाच्या जी.आर.मध्ये उपलब्ध आहेत. असे असतानाही राज्यातील ३६ जिल्ह्यांत या आदेशाचे सर्रास उल्लंघन होत असल्याचा गंभीर आरोप रसायनी येथील सामाजिक कार्यकर्ते अमोल सांगळे यांनी केला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार, एस-३० श्रेणीखालील अधिकारी, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा परिषद मुख्याधिकारी व शिक्षण अधिकारी यांना दालनात ए.सी. बसविण्याचा अधिकार नाही. तरीदेखील हे अधिकारी थंड हवेत विश्राम करत असून, सामान्य जनतेच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करत असल्याचे चित्र राज्यभर दिसून येत आहे. एकीकडे तालुका व जिल्हा न्यायालये उकाड्यात काम करत न्यायदान करत आहेत; तर, दुसरीकडे नियमबाह्य वातानुकूलित दालनांत बसलेले अधिकारी कायद्यालाच पायदळी तुडवत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते अमोल सांगळे यांनी केला आहे. तसेच, रायगड जिल्ह्यातील चौक ग्रामीण रुग्णालयात डॉक्टरांच्या दालनात वातानुकूलित यंत्र कार्यरत असताना, सामान्य रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नाहीत. ग्रामीण रूग्णालयात उपचार मिळत नसून, खासगी रुग्णालयात हजारो रुपयांचा खर्च स्वत:च्या खिशातून करावा •> पान ५ वर

### आरोग्य सेवांचा बळी

रायगड जिल्ह्यातील चौक ग्रामीण रुग्णालयात डॉक्टरांच्या दालनात वातानुकूलित यंत्र कार्यरत आहेत. मात्र, येथे येणाऱ्या सामान्य रुग्णांना उकाड्यात बसावे लागत असून त्यांना वेळेवर उपचार मिळत नसल्याचा आरोप आहे. दरम्यान, अमोल सांगळे यांना गतवर्षी मार्च महिन्यात ग्रामीण रूग्णालयात उपचार न मिळाल्याने त्यांना खासगी रुग्णालयात ३५ हजार रुपयांचा खर्च स्वत:च्या खिशातून करावा लागला होता.

# भाजपचा ‘नबीन’ बाहुला

भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष म्हणून अखेर नितीन नबीन यांची निवड झाली आहे. महिनाभरापूर्वी अचानक त्यांचे नाव कार्याध्यक्षपदी आले तेव्हाच ही निवड नक्की झाली होती. नबीन हे बिहारमध्ये पाच वेळा निवडून आलेले आमदार आहेत. शिवाय ते केवळ ४५ वर्षांचे आहेत. भारतीय जनता पक्षाची स्थापना ६ एप्रिल १९८० ला झाली, तर नबीन यांचा जन्म मे १९८० मधील आहे. म्हणजे पक्षाच्या वयापेक्षा त्यांचे वय कमी आहे. पण तरुण आहेत हे सांगण्यापलिकडे नबीन यांचे कर्तृत्व काहीही नाही. त्यांचे नाव बिहारच्या बाहेरच्या भाजपवाल्यांनीदेखील यापूर्वी कधी ऐकलेले नव्हते. त्यांनी त्रिपुरा, छत्तीसगड वगैरे राज्यांमध्ये निवडणूक प्रभारी म्हणून खूप प्रभावी कामगिरी केली वगैरे बायोडेटा आता रंगवला जात आहे. पण त्याला फार अर्थ नाही. भाजपकडे प्रचंड पैसा व सत्ता आहे. त्या जोरावर ते वाटेल तसे लोक भाड्याने घेऊ शकतात. अशांचे नियोजन करणे वा देखरेख करणे याला फार बुद्धी किंवा क्षमता लागत नाही. वाजपेयी, अडवाणी वगैरे नेते वगळले तर भाजपने आजवर दुसऱ्या फळीतल्या अनेकांना अध्यक्ष केले हे खरे आहे. पण बंगारू लक्ष्मण, वेंकय्या नायडू, जन कृष्णमूर्ती किंवा असेच इतर सर्व जण आधी राष्ट्रीय संघटनेत सरचिटणीस, उपाध्यक्ष किंवा प्रवक्ता इत्यादी भूमिकेत वावरलेले होते. शिवाय त्यातले बहुतेक सर्व जण खासदारही होते. त्यामुळे संसद व पक्षसंघटना यांचा व्यापक अनुभव त्यांना होता. आता नबीन यांच्यासारख्या नवशिक्याला तिथे निवडून मोदी व शाह यांनी पक्षावर आपलेच पूर्ण वर्चस्व राहील याची निश्चिती केली आहे. एकेकाळी नेहरु किंवा इंदिरा गांधी यांच्या काळात काँग्रेसचे अध्यक्ष म्हणजे निव्वळ होयबा आहेत अशी टीका होई. आता भाजपही त्याच वाटेने निघाला आहे. काँग्रेसमध्ये अगदी दुय्यमातला दुय्यम अध्यक्ष झाला तरी तो किमान दिल्लीत वावरलेला होता. भाजपने त्याही पुढची मजल मारली असून बिहारसारख्या मागास राज्यातील एका आमदाराला राष्ट्रीय अध्यक्ष केले आहे. भाजपची अशीच सत्ता कायम राहिली तर पुढच्या काळात हे एखाद्या गावाच्या सरपंचालाही अध्यक्ष नेमून वर पुन्हा आम्ही कसे वेगळे आहोत याची जाहिरात करू शकतील.

## निव्वळ रबर स्टँप

नबीन यांना अध्यक्षपदावर बसवताना मी त्यांचा साधा कार्यकर्ता आहे अशी भाषा नरेंद्र मोदींनी केली. असली खोटी, मानभावी किंवा खरे तर लबाड भाषा करण्यात मोदींचा हात कोणीही धरू शकत नाही. प्रत्यक्षात नबीन यांची मोदींपुढे बसण्याची देखील हिंमत होणार नाही. २०२४ च्या निवडणूक प्रचारामध्ये काँग्रेसवाले लोकांची मंगळसूत्रे पळवून मुस्लिमांची धन करणार आहेत असा अत्यंत विद्वेषी प्रचार केला होता. नंतर महाराष्ट्र निवडणुकांमध्ये काँग्रेस ओबीसी व दलितांचे आरक्षण काढून घेऊन मुस्लिमांना देऊ पाहत आहे असाही प्रचार मोदींनी केला होता. त्याबद्दल मोदींना नोटीस देण्याऐवजी निवडणूक आयोगाने पक्षाचे अध्यक्ष जेपी नड्डा यांच्याकडे जबाब मागितला होता. आता मोदी यांनी असली घाणेरडी वक्तव्ये केल्यावर नबीन मोदींना तंबी देऊ शकणार आहेत का, याचे उत्तर सर्वांना ठाऊक आहे. अर्थात, खुद्द निवडणूक आयुक्तही थेट मोदींना जाब विचारण्याचे जे धाडस करू शकत नव्हते ते नबीन यांच्यासारखा एक बाहुला म्हणून बसवलेला नेता करू शकेल ही अपेक्षाच करणे व्यर्थ आहे. एकनाथ शिंदे यांना शिवसेनेतून फोडणे आणि नंतर अचानकपणे त्यांना मुख्यमंत्री व फडणवीस यांना उपमुख्यमंत्री व्हायला सांगणे हे सर्व अमित शाह यांनी केले. २०२४ च्या निवडणुकानंतर फडणवीस यांना मुख्यमंत्री करणे, पक्षाचे नवीन अध्यक्ष नेमणे किंवा नंतर पालिका निवडणुकीत शिंदे यांच्याशी युती करण्याचा राज्य भाजपाला आदेश देणे हेही निर्णय अमित शाह यांनीच घेतले. त्यात पक्षाध्यक्ष म्हणून नड्डा यांची शून्य भूमिका होती. नड्डा हे नबीन यांच्याहून कितीतरी अनुभवी आहेत. सध्या केंद्रात मंत्रीही आहेत. तरीही एक रबर स्टँप यापलिकडे त्यांची पक्षात काहीही हैसियत नव्हती हे दिसत होते. आता हा बाहुला किंवा रबर स्टँप बदलला आहे इतकाच नबीन यांच्या निवडीचा अर्थ आहे.

## म्हणे, अध्यक्षजी

आपण काँग्रेसपेक्षा वेगळे आहोत असा भाजपचा दावा असतो. पण नड्डा यांची मुदत संपल्यानंतरही जवळपास तीन वर्षे उलटून गेली होती. पण इतक्या सामर्थ्यशाली भाजपला त्यांच्या जागी नवीन नेता निवडता येत नव्हता. हे होत नव्हते कारण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने अध्यक्षांच्या निवडीबाबत काही आक्षेप नोंदवले होते. अमित शाह यांना भूपेंद्र यादव किंवा धर्मेंद्र प्रधान अशा आपल्या ऐकण्यातल्या लोकांना त्या पदावर आणायचे होते. पण संघाचा त्यांना काही कारणांस्तव विरोध होता असे म्हणतात. संघाला मूळचा संघाचा कट्टर कार्यकर्ता असलेला व मोदी व शाह यांनाही शिस्त लावू शकेल असा कोणी नेता तिथे हवा होता असे म्हणतात. त्यादृष्टीने नितीन गडकरी, देवेंद्र फडणवीस यांच्या नावांची चर्चा झाली. पण शेवटी मोदी व शाह यांनी ती हाणून पाडली. सरतेशेवटी, ना तुमचा ना आमचा असे म्हणून नबीन यांचे नाव पुढे आणले गेले. या देशाच्या राष्ट्रपतींची निवडदेखील ओरिसातील विधानसभा निवडणुकीवर डोळा ठेवून करणारे भाजपवाले आपल्या अध्यक्षपदी बंगाली, तमिळी, केरळी घेऊन आले असते तर समजण्यासारखे होते. पण एक अनोळखी बिहारी, ज्याची जात कायस्थ म्हणजे उच्चवर्णीय आहे, त्याला या पदावर नेमून भाजपने सगळ्यांना चकवले. याचाच दुसरा अर्थ असा की, येत्या लोकसभा निवडणुकीपर्यंत भाजप संघटनेवर मोदी व शाह यांची करकचून पकड राहील व संघाला त्यात हस्तक्षेपाला काहीही वाव राहणार नाही. नबीन यांना नितीन किंवा नितीनजी न म्हणता अध्यक्षजी म्हणा असे फर्मान शाह यांनी आता काढले आहे. असले दिखावे यांना चांगले जमतात. पण वास्तव हेच असते की, काँग्रेसमध्ये ज्याप्रमाणे दिल्लीतील पक्षश्रेष्ठी हेच राजे होते, बरोबर त्याच रीतीने भाजपमध्ये सर्व कार्यकर्ते हे मोदी व शाह यांचे गुलाम आहेत. नबीन यांची निवड लोकशाही पध्दतीने झाली असाही एक देखावा करण्यात आला. पण ज्यांचे नाव बहुसंख्य कार्यकर्त्यांना ठाऊकदेखील नव्हते त्यांच्या नावाला लोकांनी अनुमोदन दिले कसे? असो. विधानसभेच्या निवडणुका असोत की पालिकेच्या त्यात अतिरिक्त रस घेणे, सतत प्रचाराच्या मूडमध्ये असणे, वाट्टेल त्या मार्गाने पक्ष वाढवणे, त्यासाठी दुसरे पक्ष फोडणे, त्यांच्या नेत्यांना धमकावणे वा पैसे देऊन विकत घेणे, खुद्द पंतप्रधानांनी सतत खोटे व विखारी बोलत राहणे हा मोदी व शाह यांच्या काळातला भाजप आहे. नबीन येवोत की आणखी कोणी, भाजपच्या या स्वरुपात बदल होण्याची सुतराम शक्यता नाही.

## विचार

# सृष्टी स्वरुप श्री गणेश

***शुभ कार्याच्या प्रारंभी गणेशाचे पूजन करण्याची आपली परंपरा आहे. सर्व देवतांचे मूळ प्रेरकस्थान श्री गणेशच आहे. श्री. गणेशाला शब्द ब्रह्म म्हणजेच ऊँकाराचे प्रतिक मानले आहे. श्री. गणेश आनंदरुप परब्रह्म आहे. नित्य आहे, अनादि आहे, निर्गुण म्हणून अवर्ण्य आहे. सर्व गुणांचा अधिपती तो गणपती. गणांचा म्हणजे समुहाचा आणि पति म्हणजेच मालक समुहाचा जो मालक तो गणपती आहे.***

**श्री. राजाराम भगत**



ऊँ गं गणपतेय नम:।

श्रीगणेश जयंती हा दिवस माघ महिन्यातील शुक्ल पक्षातील चतुर्थीला साजरा केला जातो. या जयंतीला विनायक चतुर्थी असेही म्हटले जाते. भाद्रपद महिन्यातील चतुर्थीप्रमाणे माघ महिन्यातील चतुर्थीला तेवढेच महत्व असते. हा गणपतीचा जन्म दिन होय. जेव्हा अर्धर्माची वृद्धी व धर्माची हानी होते तेव्हा साधुंचे रक्षण करण्यास दृष्टांस शिक्षा करण्यास व धर्माची स्थापना करण्यास मी जन्म घेतो.

अशी पौराणिक कथा आहे, पार्वती स्नान करण्यास जात असता तिच्या मनात विचार आले की आपण स्नान करीत असता आत कोणीही येऊ नये म्हणून कोणी तरी हवे आहे. म्हणून स्नान करते समये मळापासून तिने बालमुर्ती तयार केली व आपल्या आंतरिक शक्तीने त्या मूर्तीमध्ये जीव ओतला ती मूर्ती जिवंत झाली. तेच श्री गणेश होय तो दिवस माघ शुक्ल चतुर्थीचा होता. पार्वतीने त्या बालकांस स्नान होईपर्यंत माझ्या आज्ञेशिवाय कोणास आत पाठवू नये, आणि बालक दारापाशी उभे राहून आज्ञेचे कठोर पालन करीत असता स्वत: श्री शंकर आले. आत जाऊ लागले तेव्हा त्यांना बालकाने आत जाणेस मनाई केली. श्री शिव पुन्हा पुन्हा विनंती करीत असता तो बालक काही ऐकेना तेव्हा ते बालकास म्हणाले, अरे पार्वती माझी पत्नी आहे आणि तू माझा मुलगा आहेस तरी बालकाने त्यांस जाऊ दिले नाही. शेवटी दोघे युद्धावर आले. दोघांमध्ये युद्ध झाले. त्यात श्री शंकरांना राग अनावर होऊन त्या बालकाचे मस्तक त्यांनी उडविले. माता पार्वतीच्या ही बाब लक्षात येताच ती धायमोकले रडू लागली. ती श्री शंकरांना म्हणाली हे तुम्ही काय केलेत. काही करुन तुम्ही माझ्या मुलाला जीवंत करा माझ्या आज्ञेचे तो पालन करीत होता. यात त्याचा काहीच दोष नाही. त्याने पुत्र कर्तव्य बजावले आहे. भगवान श्री शंकर त्यावर म्हणाले, माते मी माझे पिता कर्तव्य बजावतो. त्यांनी हत्तीचे शरीर बालकाच्या धडास लावले असता बालक जीवंत झाले. मातापित्यांना आनंद झाला. तेव्हापासून माघी श्री गणेश जयंती मोठ्या थाटात सर्वत्र, विशेषत: महाराष्ट्रात आणि गोव्यात साजरी होते.

कोणत्याही शुभ कार्याच्या प्रारंभी गणेशाचे पूजन करण्याची आपली परंपरा आहे. सर्व देवतांचे मूळ प्रेरकस्थान श्री गणेशच आहे. श्री गणेशाला शब्द ब्रह्म म्हणजेच ऊँकाराचे प्रतिक मानले आहे. श्री. गणेश आनंदरुप परब्रह्म आहे. नित्य आहे, अनादि आहे, निर्गुण म्हणून अवर्ण्य आहे. सर्व गुणांचा अधिपती तो गणपती. गणांचा म्हणजे समुहाचा आणि पति म्हणजेच मालक समुहाचा जो मालक तो गणपती आहे. अशा स्वामी मध्ये गुण-पती असणेही गरजेचे आहे. गणपतीमध्ये कोणकोणते गुण आहेत ते त्याच्या बाह्यस्वरुपांवरुन आपल्याला उमजून येतात.

हत्ती हा सर्व प्राण्यांमध्ये बुद्धीवान प्राणी आहे म्हणून भगवान श्री शंकरांनी आपल्या मुलाला गणेशाला हत्तीचे शीर लावले. जीवनात यशस्वी होणेसाठी बुद्धीमत्तेची आवश्यकता असते. जमिनीवर पडलेली छोटी सुई देखील हत्ती आपल्या सोंडेने उचलू शकतो. हत्तीचे कान सुपासारखे असतात. सुप आपल्याजवळ चांगले धान्य ठेवून निकृष्ट कोलपट धान्य उडवून देते. चांगले ते आपणापाशी ठेवावे व वाईट फेकून द्यावे ही शिकवण कान देतात. गणपतीला दोन दात आहेत. पूर्ण दात श्रद्धा तर तुटलेला दात संयमाचे ज्ञान देते. गणेशाचे डोळे छोटे छोटे असून ते हत्तीप्रमाणे सुक्ष्म दृष्टी ठेवण्याची प्रेरणा देते. गणेशाला चार हात आहेत. त्याच्या चार हातामध्ये चार आयुधे आहेत. एका हातात अंकुश, दुसऱ्या हातात पाश तर तिसऱ्या हातात मोदक व चौथा हात, आशिर्वाद रुपात आहे. गणेशाचे पोट मोठे आहे म्हणून त्यास लंबोदर म्हणतात. गणपती आपल्या भक्तांनी सांगितलेल्या सर्व गोष्टी तसेच भक्तांची सर्व पापे आपल्या पोटात साठवून ठेवतो. म्हणून जे ऐकले ते सर्वच बोलून दाखविणे ही बाब हानीकारक आहे. त्याचे पाय छोटे छोटे आहेत म्हणून तो वेगाने पळू शकत नाही. गणेश व बंधु कार्तिकेय यामध्ये पृथ्वीप्रदक्षिणा कोण आधी पूर्ण करतो. अशी शर्यत लागली. गणपतीने बुद्धीचातुर्याने आपल्या मात्यापित्यांना प्रदक्षिणा मारुन शर्यत जिंकली. तेव्हा उतावळेपणाने घाईघाईने कोणताही निर्णय घेणे उचित नाही. हळूहळू पण सतत कार्यरत राहणे महत्त्वाचे असते.

पृथ्वीचे रजकण कोणी एकदा मोजील, आकाशातील तारकांची संख्या केवढी तेही सांगता येईल. पर्जन्याची एकूण धार गणून सांगता येईल पण हे ‘हे गणेशा’ तुझ्या गुणांची गणना शेषाला किंवा प्रत्यक्ष ब्रह्मदेवालाही अनेक वर्षांनी करता येणार नाही.

श्री गणपतीने चार युगात चार अवतार घेतले

१) कृतयुग- आदिती व कश्यप यांचे पोटी विनायक रुप घेऊन देवतान्तक व नरांतकचा वध केला.

२) त्रेतायुगात- पार्वतीच्या उदरी जन्म घेऊन सिंधुसुराचा वध केला.

३) द्वापारयुग- ब्रह्मदेवाच्या जांभईतून निर्माण झालेल्या सिंधुसुराच वध करुन त्याचे रक्त अंगास लावले. तेव्हापासून गणेशाच्या अंगास शेंदूर लावतात.

४) कलीयुगात - देवदत्त नावाच्या निळ्या रंगाच्या घोड्यावर स्वार होऊन, सेनेच्या मदतीने पाप्यांचा नाश करतील.

श्रीगणेशाला गुळ, त्रिशुळ, अंकुश, परशु, पाश ही शस्त्रे आवडतात.

वाहन- उंदीर, सिंह, मोर, वाघ

फुले- जास्वंद,तांबडीफुले, गणेशाला प्रिय आहेत.

दुर्वा- छोट्या गणेशाने अनलासुरास गिळू टाकल्यामुळे त्याच्या उदरात प्रचंड आग निर्माण झाली. तेव्हा सर्व देवांनी प्रयत्न करुनही आग थांबेना. तेव्हा ८०,००० ऋषींनी प्रत्येकी २१ दुर्वा गणेशाच्या मस्तकावर अर्पण केल्या. त्यामुळे गणपतीच्या पोटातील आग शांत झाली. तेव्हापासून गणेशाला दुर्वा आवडू लागल्या. शमीपत्र श्री गणेशास आवडतात.

सृष्टीच्या कणाकणांत श्री गणेश व्यापून राहिला आहे. पाने, फुले, फळे, फुलपाखरे इत्यादीत आपणास गणेशाचे रुप पहावयास मिळतो. कधी पिंपळाचे पाणी तर केव्हा गुलाबाचे फुलात, कधी दुधी भोपळ्यात तर मातीच्या ढेकळात श्री गणेशाचे विलोभनीय त्यास रुप दिसते. म्हणजेच सृष्टी स्वरुप श्री गणेश आहेत. सुर्य ज्याप्रमाणे अंधाराचा नाश करतो त्याप्रमाणे गणपतीच्या पदकमळांचे स्मरण विघ्नांच्या राशींचा नाश करते. ज्या भावनेने तुम्ही श्री गणेशाची सेवा करता त्या भावनेप्रमाणे तो तुम्हांस फळ देत असतो.

# आजही महिला सुरक्षेचा प्रश्न कायमच

**अंतरा पारंगे**

मुलगी जन्माला आल्यावर लक्ष्मी घरात आली अशी भावना कायमच असते. परंतू लक्ष्मी मानणाऱ्या त्याच मुलीकडे, महिलेकडे वाईट नजरेने बघून तिच्यावर अत्याचार करण्याच्या घटना कायमच घडत आहेत. महिलां सुरक्षेचा प्रश्न गंभीर आहे. याकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देऊन महिला सुरक्षिततेवर योग्य ते पाऊल उचलणे गरजेचे आहे.

आजच्या या आधुनिक जगात स्त्री प्रत्येक क्षेत्रात प्रगतीपथावर आहे. सामाजिक, क्रीडा, शैक्षणिक किंवा राजकीय कोणतेही क्षेत्र असोत. प्रत्येक क्षेत्रात महिलांनी कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. सरकारने महिलांना आरक्षण तर दिले आहे. पण संरक्षणाचे काय? स्त्री-पुरुष समानता असणाऱ्या आपल्या या देशात खरंच महिला सुरक्षित आहेत का? महिलांवर रोज घडणाऱ्या अत्याचारांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहे. ग्रामीण भागापासून ते शहरी भागापर्यंत आणि चिमुकल्या मुलींपासून ते वयोवृद्ध महिलांवर लैंगिक अत्याचाराच्या घटना घडत आहेत. सकाळी कामानिमित्त बाहेर पडणारी महिला किंवा शाळेत शिक्षण घ्यायला बाहेर पडणारी विद्यार्थिनी घरी सुरक्षित परत येईल का? याची शाश्वती कोणीही देऊ शकत नाही. महिलेवर अत्याचार करणाऱ्याला शिक्षा केली जाते. पीडित महिलेला न्यायही मिळतो. परंतु, दुसरी एखादी महिला कोणाची तरी शिकार होते. हे चक्र थांबविण्यासाठी किंवा अशा घटना घडूच नयेत म्हणून ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे.

आज सगळे जण ‘बेटी बचाव, बेटी पढाव’ अशा घोषणा देत असतात. परंतु, हीच बेटी सुरक्षित कशी राहील, याकडे



कोणीही लक्ष देत नाही. महिलांवरील अन्याय, अत्याचाराविरोधात उभे राहणारे फार कमी लोक असतात. आपल्या भारतीय संस्कृतीत स्त्रीला पूजनीय मानले जाते. मात्र तरीही आपल्या देशात स्त्रीचा असा अपमान होणे, तिला मान खाली घालायला करणे हे लज्जास्पद आहे. वर्तमान पत्रातील, समाज माध्यमांवरील अत्याचाराची एखादी बातमी पाहून आपण काही वेळेपर्यंत त्या पीडित महिलेविषयी हळहळ व्यक्त करतो, संताप व्यक्त करतो. अत्याचार करणारा आपल्याच समाजात वावरणारा असतो. मग तिच्या बाजूने कोणीही आवाज का उठवत नाही? याला जबाबदार कोण? तुम्ही-आम्ही की कोणतीही कठोर कारवाई न करणारे सरकार?

शासनाने यावर कठोर कारवाई, ठोस कायदे तयार करण्याची गरज आहे. आरोपीला अशी शिक्षा व्हावी की, दुसरा असे वर्तणूक करणारा एक दोन वेळा नाही तर शंभर वेळा विचार करेल. तरच हे अत्याचाराचे सत्र थांबण्यास मदत होईल.

फक्त लैंगिक अत्याचार, विनयभंगच नाही तर लग्नानंतर हुंड्यासाठी सासरच्यांकडून होणारा शारीरिक, मानसिक छळ यांचे प्रकारही वाढतच चालले आहेत. एकीकडे मुलगी घराची लक्ष्मी मनाली जाते, तर दुसरीकडे घराला वंशाचा दिवा हवा म्हणून स्त्री भ्रूणहत्या केली जात आहे. असे प्रकारही दिवसेंदिवस वाढत आहेत. मुलीला जन्म घेण्याआधीच मारणाऱ्यांनाही तितकीच कठोर शिक्षा होणे गरजेचे आहे. कठोर शिक्षा होत नसल्याने असे प्रकार करणाऱ्यांचे फोफावत आहे. त्यामुळे सरकारने याकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे.

अत्याचारांच्या घटनांमध्ये चिमुकल्या मुलींसह शालेय विद्यार्थिनी, तरुणी ते वयोवृद्ध महिलांचा बळी जात आहे. आजची स्त्री कुठेही सुरक्षित नाही. रिक्षा, बसमध्ये, भर रस्त्यात, शाळेत, शौचालय, दवाखाना एवढेच नाही तर घरातही ती सुरक्षित नाही. कधी शाळेत शिक्षकाकडून विद्यार्थिनीचा विनयभंग होतो, तर स्कुल बसमध्ये चालकांकडून अत्याचार होतो. घरकाम करणाऱ्या महिलेवर, तर कधी दवाखान्यात डॉक्टर किंवा नर्स याला बळी पडते. चॉकलेट, खाऊचे आमिष दाखवून शेजाऱ्याकडून लहान मुलीचे शोषण केले जाते. यात संतापजनक म्हणजे आपले रक्षण करणारे पोलीसही याला अपवाद नाही. प्रत्येकवेळी पालक मुलीच्या सोबत राहू शकत नाही आणि तेवढेच हेही खरे आहे की कोणावर विश्वासही ठेवता येत नाही. एखाद्या तरुणीवर अत्याचार करून तिला ठार मारले जाते. यांनतर सगळे कँडल मार्च काढून, रस्त्यावर उतरुन त्याचा निषेध करतात. मात्र असे प्रकार थांबतील कसे, याचा विचार मात्र कोणीही करत नाही.

अशा घटना घडू नयेत यासाठी आजवर असा कोणताही ठोस कायदा का करण्यात आला नाही? माहित नाही.

## लोकसंसद

### माघी गणेश जयंती

श्री गणेश जयंती अर्थात ‘माघी गणेश जयंती’. आज आपण या दिवसाचे महत्त्व जाणून घेऊया. या दिवशी सर्वात प्रथम श्री गणेश तत्वाच्या लहरी पृथ्वीवर आल्या. या दिवसाचे वैशिष्ट्य म्हणजे या दिवशी श्री गणेशाचे तत्व अन्य दिवसांच्या तुलनेत एक हजार पटीने पृथ्वीवर येत असते. त्यामुळे आपण जर गणपतीची कोणत्याही प्रकारे उपासना केली तर आपल्याला गणपतीच्या कृपेचा एक हजार पटीने लाभ होतो. त्यामुळे या दिवशी आपण प्रात:समयी पासून रात्रीपर्यंत जेव्हा शक्य होईल तेव्हा श्री गणेशाचा नामजप करणे, गणपतीची भावपूर्ण पूजा, आरती करणे, गणपतीला लाल फूल व दुर्वा वहाणे याप्रकारे उपासना करू शकतो आणि गणेश तत्व ग्रहण करण्याचा प्रयत्न करू शकतो. गणपतीचा ‘ॐ गं गणपतये नमः।’ किंवा ‘श्री गणेशाय नमः ।’ हा नामजप करू शकतो. गणपती अथर्वशीर्ष म्हणणे सुद्धा पुष्कळ लाभदायक आहे. अथर्वशिर्षाची फलश्रुती वाचल्यानंतर या स्तोत्राचे प्रचंड सामर्थ्य लक्षात येईल. बुद्धिदाता, विघ्नहर्ता श्री गणेशाला शरण जाऊन प्रार्थना करूया की, त्याने आम्हाला कायम सुबुद्धी देवो, आमची विवेकबुद्धी कायम जागृत राहो आणि आमच्याकडून त्याला अपेक्षित असे कार्य घडो!

**– सौ. आदिती अमित देखणे, नवीन पनवेल.**

### प्रजासत्ताक दिनाचे नेत्रसुखद संचलन!

१५ ऑगस्टचा स्वातंत्र्य दिन आणि २६ जानेवारीचा प्रजसत्ताक दिन म्हणजे समस्त भारतीयांचे अत्यंत जिव्हाळ्याचे विषय! दरवर्षी २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिनी भारताच्या राष्ट्रपतींच्या अध्यक्षतेखाली राजधानी दिल्लीच्या 'कर्तव्यपथा'वर एक दिमाखदार संचलन पार पडते. या वेळी लष्कर, नौदल आणि हवाई दलाच्या अनेक तुकड्या यात भाग घेतात. देशाच्या लष्करी सामर्थ्याचे दर्शन होते. भारताची वैविध्यपूर्ण संस्कृती दर्शविणारे विविध राज्यांचे, तसेच विविध मंत्रालयांचे चित्ररथ हे या संचलनाचे प्रमुख आकर्षण असते. विविध विषयांनी नटलेले हे बहुरंगी आणि बहुढंगी चित्ररथ म्हणजे एक नेत्रसुखद पर्वणीच असते. यंदाच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनाच्या संचलनाची संकल्पना ७ नोव्हेंबर १८७५ रोजी बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी रचलेल्या ‘वंदे मातरम’ या राष्ट्रीय गीताच्या १५० व्या वर्धापनदिनानिमित्त ‘वंदे मातरम, स्वातंत्र्याचा मंत्र’ व ‘वंदे मातरम, समृद्धीचा मंत्र’ आणि ‘आत्मनिर्भर भारत’ अशी ठेवण्यात आली आहे. यंदाच्या संचलनात राज्याची प्रमुख सांस्कृतिक ओळख असलेल्या गणेशोत्सवावर आधारित महाराष्ट्राचा ‘गणेशोत्सव: आत्म निर्भरतेचे प्रतीक’ या चित्ररथाचा समावेश केला गेला आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे**

## दिनविशेष

# माघी श्री गणेश जन्मोत्सव

गणेश चतुर्थी आणि गणेश जयंती भारतात साजऱ्या केल्या जाणाऱ्या महत्त्वपूर्ण उत्सवांपैकी एक आहेत. मात्र, गणेश चतुर्थी आणि गणेश जयंती यात नेमका फरक काय आहे याबाबत लोकांमध्ये संभ्रम आहे. या प्रसंगी गणेशाचा जन्म झाला असं काही लोक मानतात. पण खरंच असं आहे का? यामागे काही पौराणिक कहाणी आहे का? याविषयी आजच्या लेखातून जाणून घेऊयात. गणेश चतुर्थी ऑगस्ट किंवा सप्टेंबर महिन्यात (मराठी महिना भाद्रपद) साजरी केली जाते तर गणेश जयंती माघ महिन्यात येते जी इंग्रजी कॅलेंडरनुसार, जानेवारी किंवा फेब्रुवारीमध्ये येते. हे दोन्ही शुक्ल पक्षातील चतुर्थी तिथीला साजरे केले जाणारे सण आहेत.

गणेश चतुर्थी, ज्याला विनायक चतुर्थी (शुक्ल पक्ष) किंवा संकष्टी चतुर्थी (कृष्ण पक्ष) म्हणूनही ओळखलं जातं. भगवान गणेशाचे त्याच्या दैवी निवासस्थान कैलासपर्वतापासून ते पृथ्वीवर होणारे वार्षिक आगमन म्हणून भाद्रपदातील गणेश चतुर्थी साजरी केली जाते. पुराणानुसार, असंही म्हटलं जातं की आपला भाऊ भगवान कार्तिकेयाला भेटण्यासाठी गणेशाने कैलास पर्वत सोडला, जिथे देवी पार्वती आणि भगवान शिव राहत होते, कार्तिकेयाच्या भेटीनंतर ११ दिवसांनी गणेश मूळ घरी परतले. याचीच आठवण म्हणून भाद्रपदात गणेश चतुर्थी साजरी केली जाते. त्याचबरोबर धार्मिक मान्यतेनुसार गणपती बाप्पाचा जन्म गणेश जयंतीच्या दिवशी झाला होता.

धार्मिक परंपरेनुसार, माघ गणेश जयंती हा गणपतीचा खरा जन्मदिवस आहे. जरी त्याच्या जन्माशी संबंधित अनेक कथा आणि पौराणिक कथा असल्या तरी त्यातील सर्वात लोकप्रिय कथा म्हणजे देवी पार्वतीने भगवान गणेशाला जन्म दिला ती कथा. भगवान शिवाच्या अनुपस्थितीत, तिने तिच्या अंगावर चंदनाचा लेप लावून त्यापासून गणेशाची मूर्ती तयार केली आणि आंघोळीसाठी गेली असताना तिच्या संरक्षणासाठी तिने गणेशाला बाहेर पहारा देण्यासाठी प्रवेशद्वारावर उभे केले. जेव्हा भगवान शिव तिथे आले आणि त्यांनी आत जाण्याचा प्रयत्न केला, तेव्हा त्यांचे भगवान गणेशाशी भांडण झाले कारण त्याने आपल्या आईच्या आज्ञेनुसार शंकराला प्रवेश दिला नाही. रागाच्या भरात शिवाने गणेशाचे मस्तक छाटले. जेव्हा पार्वतीने हे दृश्य पाहिले तेव्हा तिने देवी कालीचे रूप धारण केले आणि जगाचा नाश करण्याची धमकी दिली. याची सर्वांनाच चिंता वाटू लागली आणि त्यांनी भगवान शंकराकडे उपाय शोधून श्रीगणेशाला हत्तीचे मस्तक बसवले. भगवान शिवाने आपल्या शक्ती सामर्थ्याने पुन्हा त्याला जिवंत केले. यानंतर भगवान शिवाने पार्वतीला वचन दिले की पृथ्वीवरील इतर सर्व देवतांच्या आधी तिच्या मुलाची अर्थात गणेशाची पूजा केली जाईल. गणेश जयंती हा सण विशेषतः महाराष्ट्रात खूप लोकप्रिय आहे. हा सण माघ महिन्याच्या शुक्ल पक्षातील चतुर्थीच्या दिवशी साजरा केला जातो. एका आख्यायिकेनुसार, एकदा भगवान श्रीकृष्णावर चोरीचा आरोप झाला कारण त्यांनी माघ शुक्ल चतुर्थीला चंद्र पाहिला, जो शुभ मानला जात नव्हता. भगवान श्रीकृष्णाने त्या दिवशी उपवास केला आणि चोरीच्या आरोपातून ते मुक्त झाले. तेव्हापासून माघ शुक्ल चतुर्थीला व्रत करण्याची परंपरा सुरू झाली. या दोन प्रमुख सणांशिवाय दर महिन्याला २ गणेश चतुर्थी व्रत देखील पाळले जातात. एक शुक्ल पक्षातील चतुर्थी तिथीला आणि दुसरे कृष्ण पक्षातील चतुर्थी तिथीला.

धार्मिक मान्यतेनुसार गणेश जयंतीला गणेशाचा जन्मोत्सव साजरा केला जातो. पौराणिक कथेनुसार या दिवशी गणेशाचा जन्म झाला होता. या दिवशी मध्यान्हात गणेशाची पूजा केली जाते. आणि पौराणिक कथेनुसार, भाद्रपदातील गणेश चतुर्थीच्या दिवशी भगवान गणेश कैलास पर्वतावरून पृथ्वीवर येतात. गणेश जयंतीच्या दिवशी उपवास करून बाप्पाची विधीनुसार पूजा केल्याने गणपतीच्या आशीर्वादाने माणसाच्या सर्व मनोकामना पूर्ण होतात आणि आयुष्यभर सुख, शांती व संपत्ती टिकून राहते.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२२ जानेवारी

१) श्री.नंदलाल मुरलीधर शर्मा
मु.धोकावडे, ता. अलिबाग
२२-०१-१९४८


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८**
**(बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५**
**(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते

**श्री. मनोज मधुकर गोतावडे, वाढदिवस, गोंधळपाडा, अलिबाग**


# खड्ड्यांमुळे अर्थकारण ठप्प

## कशेळे भागातील रस्त्याची दुरवस्था; स्थानिक व्यावसायिकांचे राज्य रस्ते विकास विभागाला निवेदन

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील आदिवासी भागातील ५० हून अधिक गावे आणि आदिवासी वाड्यांची कशेळे बाजारपेठ रस्त्यावरील खड्ड्यांमुळे बंद होण्याच्या मार्गावर आहे. बाजारपेठेमधून जाणारा राष्ट्रीय महामार्ग रस्ता खड्ड्यात हरवला आहे. रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनांमुळे उडणारे धुळीचे लोट लक्षात घेऊन व्यवसाय बंद करण्याची वेळ स्थानिकांवर आली आहे. दरम्यान कशेळे बाजारपेठेतील आर्थिक व्यवहार ठप्प झाले आहेत. या भागातील अपूर्ण रस्त्याचे तात्काळ काँक्रीटीकरण करावे, अशा मागणीचे निवेदन स्थानिक व्यावसायिकांनी राज्य रस्ते विकास महामंडळाला दिले आहे.



### पंधरा दिवसात खड्डे बुजवण्याचे आश्वासन

कशेळे येथील सामाजिक कार्यकर्ते उदय पाटील, राजेंद्र हरपूडे, सचीन राणे, दिनेश हरपूडे, विजय शिंदे यांनी मुंबई येथे राज्य रस्ते विकास महामंडळाच्या मुख्य कार्यालयात जाऊन उपाध्यक्ष अनिलकुमार गायकवाड यांची भेट घेतली. रस्त्यावरील खड्डयासंदर्भात चर्चा करून ते बुजवण्याबाबत विनंती केली असता कार्यकारी अभियंता अरुण देवकाते यांनी या रस्त्यावरील सर्व खड्डे पंधरा दिवसात बुजवण्याचे आश्वासन दिले आहे. त्याचवेळी रस्त्यावर अपूर्ण असलेले काँक्रिटीकरणाचे काम देखील सुरु करण्यात येईल, असे आश्वाससन दिले आहे.

कशेळे-कर्जत रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. विशेषतः कर्जत बाजारपेठ येथील रस्ता पूर्णपणे उखडला आहे. कशेळे नाका, पेज नदी वंजारवाडी या परिसरात अनेक ठिकाणी रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. पेज नदी पुलावरील खड्डयांमुळे अनेक अपघात झाले असून काही लोकांना जीव गमवावा लागला आहे. या संदर्भात कर्जत तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते आणि समाजमाध्यमांवर सातत्याने आवाज उठवला जात आहे. त्यात रस्त्यावरून वाहनांची सतत वर्दळ असते. त्याचा परिणाम रस्त्यावरुन वाहने गेल्यावर धुळीचे लोट उडतात. धुळीमुळे दुकानांमधील साहित्य खराब होत आहे. हा सर्व प्रकार मागील तीन महिन्यापासून वाढला आहे. रस्त्यावरील खड्डे आणि धुळीचे लोट यामुळे व्यवसाय बंद करण्याची वेळ व्यावसायिकांवर आली आहे.

या रस्त्यावर थोडीफार डागडुजी करून ठेकेदारांनी हात झटकले. कशेळे गावातील ग्रामस्थ आणि व्यापारी संघटना यांनी गणपती काळात स्वखर्चाने कशेळे गाव ते वंजारवाडीपर्यंत मुरूम टाकून खड्डे भरले. त्यामुळे वाहन चालकांना थोडाफार दिलासा मिळाला होता. परंतु, पावसाळ्यानंतर या मुरुमाचा धुरळा होऊन कशेळे बाजार पेठेतील सर्व दुकानात आणि आजूबाजूच्या घरात धूळ उडून नागरिकांना श्वसनाचे विकार होत होते. सरकारी दवाखाना परिसरातील खड्ड्यांमुळे दवाखान्यात जाणाऱ्या गरोदर महिलांना त्रास होत होता. याबाबत कशेळे ग्रामस्थांनी रस्त्याची दुरुस्ती लवकर व्हावी, याकरिता संबंधित अधिकारी यांना उपोषणाचा ईशाराही दिला होता. परंतु, या बाबतही सर्वच अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले.

## मंगेश आंबेरकरांना पुरस्कार प्रदान

**। पुणे । प्रतिनिधी ।**

आदर्श भंडारी समाजोन्नती मंडळ, पुणेच्या वतीने संस्थेचे संस्थापक कै. मामासाहेब उर्फ स. जो. वेंगुर्लेकर यांचे स्मरणार्थ देण्यात येणारा जीवन गौरव पुरस्कार कॅप्टन मंगेश आंबेरकर यांना देण्यात आला. उद्यान कार्यालय पुणे येथे शनिवारी (दि.१७) मुरलीकांत रा. पेटकर यांच्या हस्ते, क्रीडा संघटक सुनिल नेवरेकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कॅप्टन मंगेश आंबेरकर यांनी सेनादलाचे माध्यमातून व शालेय जिवनापासून विविध क्रीडा स्पर्धामध्ये भाग घेऊन विशेष नैपुण्य मिळविले आहे.



सध्या मार्गदर्शकाची भूमिका बजावीत आहेत. तसेच, यावेळी समाजातील विशेष नैपूण्य दाखविलेले पाल्य सर्वश्री हार्षिता मांजरेकर, वेदांत पेडणेकर, सानिका केरकर, मयुरी नाईक, अमेय घारे, सार्थक सरमळकर, रुपाली माडये, यश शिंदे, श्रोत पेडणेकर, यांचाही विशेष सत्कार मान्यवरांचे हस्ते करण्यात आला.

## ज्येष्ठ नागरिक संस्थेचा स्नेहमेळावा




**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबागमधील भालनाका येथील ज्येष्ठ नागरिक संस्थेचा वनभोजन व स्नेहमेळावा मानी-भुते येथील श्री शिवमंदिर व भवानी माता मंदिर परिसरातील निसर्गरम्य वातावरणात पार पडला. भूषण जगन्नाथ म्हात्रे यांच्या ग्रीन व्हिला कॉटेजमध्ये आयोजित या सोहळ्यात ४० सदस्यांनी सहभाग घेतला होता.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिगंबर पाटील व विकास खोपकर यांनी केले. अध्यक्ष श्रीरंग घरत यांनी आपल्या भाषणात संस्थेच्या स्थापनेचा हेतू आणि १८ वर्षांतील कार्याचा सविस्तर आढावा घेतला, तर अरुण पाटील यांनी संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. या स्नेहमेळाव्यात अनेक सदस्यांनी आपली मनोगते व्यक्त करत जुन्या आठवणींना उजाळा दिला.

मनोरंजनाच्या सत्रात विनोदी किस्से, सद्यस्थितीवर भाष्य आणि नवीनचंद्र राऊत यांच्या पुढाकाराने गायनाचा कार्यक्रम सादर झाला. महिलांच्या हळदीकुंकू समारंभानंतर आयोजित संगीत खुर्चीच्या खेळात महिला व पुरुष अशा दोन्ही गटांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोहन माळी व हरिश्चंद्र सानप यांनी विशेष मेहनत घेतली. यावेळी विकास खोपकर यांच्याकडून सदस्यांना नवीन वर्षाची भेट म्हणून डायरीचे वाटप करण्यात आले.

## विविध शैक्षणिक उपक्रमांचे मार्गदर्शन

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

पंचायत समिती मुरुडच्या शिक्षण विभागांतर्गत बोर्ली केंद्राची शिक्षण परिषद कोर्लईच्या जि. प. शाळेत घेण्यात आली. मुरुडचे गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या सभेत विविध शैक्षणिक विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थी सुरक्षा, विनोबा ॲप, मुख्यमंत्री माझी शाळा, व्हीएसके आणि एमडीएम उपस्थिती, परसबाग, संचमान्यता, आधार अपडेशन या आणि अशा अनेक विषयांवर सखोल चर्चा आणि शिक्षकांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच, अलीकडेच शिक्षकांसाठी सक्तीची केलेल्या टीईटी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या शरद पाटील, महेंद्र सातामकर या शिक्षकांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. मानसी कवळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या परिषदेस शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भटक्या कुत्र्यांची दहशत सुरूच

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील उमरोली ग्रामपंचायतीमधील भटक्या कुत्रांची संख्या कमी होण्याचे नाव घेत नाही. त्यात भटक्या कुत्रांच्या बंदोबस्तबाबत देखील कोणत्याही उपाययोजना केल्या जात नाहीत. अशातच मंगळवारी एका शालेय विद्यार्थ्यांवर भटक्या कुत्र्याने हल्ला केला. या भागात सतत कुत्र्यांमुळे हल्ले होत असून भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी स्थानिकांकडून केली जात आहे.

कर्जत तालुक्यातील उमरोली ग्रामपंचायत हद्दीत भटक्या कुत्र्यांचा उपद्रव स्थानिकांसाठी डोकेदुखी बनला आहे. या भटक्या कुत्र्यांनी अनेक लहान मुलाला घेतला चावा घेतला आहे. दरम्यान स्थानिक ग्रामस्थ आणि लहान मुलांचे या भटक्या कुत्र्यांपासून संरक्षण व्हावे, यासाठी उमरोली ग्रामपंचायतीने यावर उपाययोजना करावी, अशी मागणी स्थानिकांकडून सतत केली जात आहे.



कर्जत-कल्याण राज्यमार्ग रस्त्यावर असलेल्या उमरोली ग्रामपंचायत हद्दीमध्ये उमरोली, आषाणे, पोतदार वसाहत, पाली वसाहत, डिकसळ या गावाच्या प्रस्त अनेक भटकी कुत्री आढळून येत आहेत. त्यात नव्याने या भागात येणाऱ्या कुत्र्यांची संख्या मोठी आहे. त्यात प्रामुख्याने या भागात कुत्रे आणून सोडले जात असल्याचे दिसून येत आहे. रस्त्याच्या बाजूला असलेल्या हॉटेलमधील उष्टे खाणे खाण्यासाठी कुत्रे एकत्र जमत असल्याचे दिसून येत आहे. या भटक्या कुत्र्यांनी आतापर्यंत १० लोकांच्या हातापायाचे लचके ओढले आहेत. त्यातच शाळेत जाणाऱ्या वेद संजय रसाळ या विद्यार्थ्यांवर झडप घातली आणि त्याला जखमी केले.

## मोठी जुईत विविध कार्यक्रमांचे नियोजन



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील मोठीजुई येथे गुरुवार दि.२२ रोजी सार्वजनिक माघी गणेशोत्सव साजरा करण्यात येत आहे. गेल्या पंधरा वर्षांपासून मोठीजुई येथे मोठीजुई राजाच्या भव्य गणेश मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. ही फणादारी शेषावर विराजमान झालेली भव्य व आकर्षक गणेश मूर्ती घडविण्याचे काम महाराष्ट्रातील प्रसिद्ध मूर्तिकारांनी केले आहे. अशी माहिती संस्थापक अध्यक्ष के.जी. पाटील यांनी दिली.

या गणेश जयंती उत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे नियोजन गेल्या अनेक दिवसांपासून सुरू होते. माघी गणेशोत्सव उत्साहात साजरा करण्यासाठी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष के. जी. पाटील, कार्याध्यक्ष प्रणित पाटील, उपाध्यक्ष हर्षल भोपी, खजिनदार विवेक पाटील, सचिव चिराग भगत तसेच मंडळाचे अन्य कार्यकर्ते विशेष परिश्रम घेतले.

## निवडक

### माघी गणेश जयंती उत्सवानिमित्त मंदिर सजावट

**उरण** : माघी श्री गणेश जयंती निमित्ताने गुरुवार दि.२२ जानेवारी रोजी उरण तालुक्यातील गणेश मंदिरात उत्सव साजरा केला जाणार आहे. यानिमित्ताने सर्व गणपती मंदिरात सजावट करण्यात आली आहे. उरण तालुक्यातील चिरनेर येथील गणपती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जाणार असल्याची माहिती मंदिर प्रशासनाचे अध्यक्ष महेंद्र पाटील यांनी दिली. उरण तालुक्यातील चिरनेर, सोनारी, केगाव विनायक येथील रिद्धी-सिद्धी विनायक मंदिर, बोकडविरा गणेश मंदिर, उरण शहरातील गणपती मंदिर येथे जय्यत तयारी करण्यात आली आहे. ठीक-ठिकाणी घरगुती गणपती उत्सव, सार्वजानिक उत्सव साजरे करण्यात येणार आहेत. मंदिराला रंगरंगोटी करण्यात आली आहे. श्री गणेश जयंती निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, असे गणपती देवस्थानचे विश्वस्त यांनी सांगितले.



### जिल्हास्तरीय उडान महोत्सवाचे आयोजन

**पोलादपूर** : शिवाई शिक्षण प्रसारक मंडळ, महाड संचलित पोलादपूर तालुक्यातील चोळई येथील सुंदरराव मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये शनिवार, दि.२४ जानेवारी रोजी उडान महोत्सव-२०२६ या मुंबई विद्यापीठांतर्गत संपन्न होणाऱ्या रायगड जिल्हास्तरीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम सकाळी नऊ ते सायंकाळी पाच या वेळेमध्ये होणार असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. सुनील बलखंडे यांनी दिली. मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन आणि विस्तार कार्य विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांमधील विविध कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रतिवर्षी या महोत्सवाचे आयोजन केले जाते. रायगड जिल्ह्याच्या वीस विविध महाविद्यालयांमधील ३००हून अधिक विद्यार्थी या उडान महोत्सवातील पोवाडा गायन, पथनाट्य, पोस्टर मेकिंग, वक्तृत्व आणि क्रिएटिव्ह रायटिंग या विविध स्पर्धांमध्ये सहभागी होणार आहेत. या उडान महोत्सवाचे उद्घाटन दि.२४ जानेवारी रोजी सकाळी नऊ वाजता आजीवन अध्ययन विभागाचे संचालक डॉ. बळीराम गायकवाड, प्रा कुणाल जाधव तसेच शिवाई शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड संतोष काळे, खजिनदा किशोर मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. याच दिवशी सायंकाळी पाच वाजता शिवाई शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. विनोद देशमुख, सचिव अशोक देशमुख व महाविद्यालय विकास समितीचे सर्व सदस्य यांच्या प्रमुख उपस्थितीत उडान महोत्सवांतर्गत घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरणदेखील होणार आहे.

### विठोबा बेर्डे यांचे निधन

**सुतारवाडी** : रोहा तालुक्यातील जामगाव येथील ज्येष्ठ नागरिक विठोबा नारायण बेर्डे यांचे वयाच्या ७७ व्या वर्षी निधन झाले. मनमिळावू स्वभाव, अध्यात्माची आवड असणाऱ्या विठोबा बेर्डे यांच्या निधनाने नातेवाईक तसेच जामगाव परिसरामध्ये दुःख व्यक्त केले जात आहे. त्यांच्या पश्चात मुले, सुना, नातवंड असा परिवार मोठा अपरिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी दि.२५ जानेवारी रोजी श्रीक्षेत्र हरिहरेश्वर येथे, तर उत्तरकार्य राहत्या घरी जामगाव येथे दि.२७ जानेवारी रोजी होणार आहेत. या कालावधीमध्ये गरुड पुराण ग्रंथ वाचन तसेच राजाराम महाराज गांगण यांचे कीर्तन होणार असल्याची माहिती मुलगा नारायण बेर्डे यांनी दिली.

### ‘भारताचे संविधान उद्देशिका’ फ्रेम भेट




**कोलाड** : कांदळे येथील निवृत्त नायब तहसीलदार शरद मोते यांच्याकडून राजिप प्राथमिक शाळा गोवे शाळेला सोमवारी (दि.१९) भारताचे संविधान उद्देशिका फ्रेम भेट देण्यात आली. तसेच राजिप केंद्र शाळा कोलाड, राजिप शाळा कांदळे, द. ग. तटकरे हायस्कूल कोलाड, राजिप विठ्ठलवाडी, तसेच कोलाड खांब परिसरातील असंख्य शाळेला भारताचे संविधान उद्देशीका भेट देण्यात आली. शाळेतील विद्यार्थ्यांना भारताच्या संविधानाचे महत्व समजण्याच्या उद्देशाने शरदजी मोते निवृत्त नायब तहसीलदार यांनी स्वखर्चाने भारताचे संविधान उद्देशिकाची फ्रेम तयार करून भेट दिली. यावेळी शरद मोते यांच्या वतीने त्यांचा मुलगा गौरव मोते व त्यांचा परिवार यांनी गोवे शाळेतील मुख्याध्यापिका रुपाली कापसे, उपशिक्षिका प्रतीक्षा बडे तसेच असंख्य विद्यार्थ्यांच्या उपस्थित होते. यावेळी शाळेच्या मुख्यध्यापिका रुपाली कापसे यांनी शरद मोते व त्यांच्या परिवाराचे आभार मानले.

### महाश्रमदानातून स्वच्छता मोहीम



**म्हसळा** : म्हसळा तालुक्यातील ग्रामपंचायत साळविंडे हद्दीत सर्व गाव, वाडी-वस्तीमध्ये शुक्रवारी (दि.१६) स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) व मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत महाश्रमदानातुन स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेमध्ये गावातील मुख्य व अंतर्गत रस्ते, वैयक्तिक घर परिसर, गाव, गावासभोंवतालीचा परिसर, मैदाने स्वच्छ करण्यात आली. स्वच्छता मोहिमेमध्ये साळविंडे ग्रामपंचायत सरपंच उद्देश सखाराम पारदुले, उपसरपंच जागृती जगदीश सावंत व ग्रामपंचायत सदस्य सहभागी होते. तसेच, साळविंडे हद्दीतील गाव वाडी वस्तीमधील पुरुष, महिला यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद देऊन सहभाग घेतला. मोहिमेत माधव जाधव, गटविकास अधिकारी पंचायत समिती म्हसळा, दिघीकर विस्तार अधिकारी ग्रा.पं, खराडे विस्तार अधिकारी सांख्यिकी व अमित तोंडलेकर तालुका स्वच्छता समन्वयक हे उपस्थित होते.

### अनधिकृत बांधकामांवर कारवाई

**मुंबई** : कुर्ला पश्चिममधील अनधिकृत बांधकामांवर पालिकेने बुलडोझर चालवत पाडकामाची कारवाई केली. यामध्ये, कुर्ला पोलीस ठाणे हद्दीतील ५३ आणि विनोबा भावे नगर पोलीस ठाणे हद्दीतील १८ असे एकूण ७१ अनधिकृत फेरीवाले, दुकानं आणि दुकानांनी केलेली अनधिकृत बांधकामांचा समावेश आहे. अतिक्रमण कारवाईसाठी ४ वाहने, २ जेसीबी आणि इतर यंत्रांच्या सहाय्यानं ही कारवाई करण्यात आली. गेल्या अनेक दिवसांपासून स्थानिक नागरिकांकडून तक्रारी येत होत्या की, फुटपाथवरून चालणे कठीण झाले आहे, रस्ते अरुंद झाले आहेत, वाहतूक कोंडी वाढते आहे आणि अपघातांचा धोका निर्माण झाला आहे. याची दखल घेत पालिकेने ही कारवाई केली.

पान १ वरून

### कर्जत तालुक्यातून लाल मातीची वाहतूक

तहसीलदार यांच्याकडून कारवाई सुरू झाल्यानंतर काही प्रमाणात मातीची तस्करी थांबली होती. परंतु, पावसाळा संपल्यानंतर पुन्हा एकदा लाल मातीचे उत्खनन सुरू झाले असून, लाल मातीची वाहतूक कर्जत तालुक्यातील रस्त्यावरून सुरू आहे. गेल्या महिनाभर ही वाहतूक रात्री ८ वाजल्यापासून पहाटेपर्यंत सुरू असताना रस्त्यांची दुरवस्था होत असल्याच्या तक्रारी आदिवासी भागातील ग्रामस्थ करीत आहेत. त्यामुळे अशी अवैध वाहतूक थांबवण्यात यावी, अशी मागणी साळोख ग्रामपंचायतीमधील ग्रामस्थ करीत होते.

याबद्दल महसूल विभागाला माहिती मिळाल्यानंतर तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांच्या सूचनेने महसूल विभागातर्फे मंगळवारी रात्री लाल मातीची अवैध वाहतूक करणाऱ्या हायवा गाड्यांवर कारवाई करण्यात आली. महसूल विभागाच्या पथकाने मुरबाड-कर्जत राष्ट्रीय महामार्गाने वाहतूक करणाऱ्या लाल मातीने भरलेले एक हायवा वाहन कडाव येथे ताब्यात घेतले. ते वाहन कर्जत तहसील कार्यालयाच्या आवारात उभे करण्यास सांगून नायब तहसीलदार आणि ३ गाव महसूल अधिकारी व तलाठी यांचे पथक कर्जत-मुरबाड रस्त्याने कळंबकडे जात असताना आणखी एक हायवा गाडी महसूल खात्याला चकवा देऊन पुढे गेली. त्यानंतर महसूल खात्याच्या मदतीला काही आदिवासी तरुण आले आणि त्यांनी ठाणे जिल्ह्याच्या हद्दीकडे जाणाऱ्या रस्त्यावर आणखी एक लाल मातीने भरलेली हायवा गाडी अडवून ठेवली. त्या गाडीचा पंचनामा महसूल विभागाच्या पथकाने मध्यरात्री १ वाजता केला आणि ती गाडी नेरळ पोलीस ठाण्याच्या कळंब आऊट पोस्ट येथे आणून उभी करण्यात आली.

महसूल खात्याचे पथक साळोख ग्रामपंचायत हद्दीत लाल मातीची अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई केली जात होती. त्यावेळी मुरबाड तालुक्याचे हद्दीत तब्बल आठ हायवा गाड्या आणि एक पोकलेन मशीन तेथे माती काढण्याचे काम करीत सुरू होते. त्या ठिकाणी कर्जत महसूल विभागाचे पथक ठाणे जिल्ह्याची हद्द असल्याचे कारण देऊन त्या उत्खननाकडे महसूल खात्याने दुर्लक्ष केले. त्यामुळे कर्जत महसूल खात्याच्या या कारवाई करताना मुरबाड तालुका तहसील कार्यालयाशी संपर्क करून करावी, अशी मागणी होत आहे.

### भरत गोगावलेंना ध्वज फडकविण्याचा मान

यांना हा मान देण्यात आला होता. त्यावेळी मंत्री भरत गोगावले यांनी नाराजी व्यक्त करतानादेखील वरिष्ठांचा निर्णय मान्य असल्याचे सांगितले होते. मात्र, यावर्षी मंत्रालयाने थेट परिपत्रक काढत भरत गोगावले यांचे नाव जाहीर केले आहे.

### खोपोलीत शेकापची ‘एकला चलो’ची भूमिका

उमेदवारी अर्ज दाखल केल्याने परिवर्तन विकास आघाडीचे टेन्शन वाढले आहे. नगरपालिकेच्या निवडणुकीत शेकापच्या पाठिंब्यामुळे परिवर्तन विकास आघाडीला बळ मिळाल्यामुळे घवघवीत यश मिळाले होते. मात्र, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत शेकपला ठाकरे गट आणि अजित पवार गटाने विचारात न घेता सन्मानजनक जागा न दिल्यामुळे शेकाप परिवर्तन विकास आघाडीतून बाहेर पडला आहे. शेकापने खानाव आत्करगांव जि.प. गटातून मिता संतोष पाटील, खानाव पंचायत समिती गणातून शांताराम पाटील, सावरोली जि.प. गटातून जयवंत पाटील, वडगांव पं.स. गणातून चंद्रकांत पाटील, चौक जि.प. आणि पं.स. गणातून करूणा होला यांनी उमेदवारी अर्ज भरले आहेत. यावेळी कर्जत खालापूर विधानसभा चिटणीस संतोष जंगम, महिला जिल्हा चिटणीस शिवानी जंगम, तालुका चिटणीस किशोर पाटील, युवा मोर्चा जिल्हा चिटणीस भूषण कडव, शेकाप युवा खालापूर तालुका उपाध्यक्ष विक्रम गायकवाड, धनंजय देशमुख, द्वारकानाथ गावडे, किसन विचारे, सुरेश गावडे, हेमंत होल्ला, समीर मोरे व रमेश दळवी यांच्यासह शेकापक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

परिवर्तन विकास आघाडीतून बाहेर पडत एकला चलोची भूमिका घेतली असून, यापुढे पक्षश्रेष्ठी जो निर्णय घेतील, तो आम्हाला मान्य असेल. तसेच, निवडणुकीत शेकाप मोठा विजय संपादन करतील, असा विश्वास शेतकरी कामगार पक्षाच्या महिला जिल्हा चिटणीस शिवानी जंगम यांनी व्यक्त केला आहे.

### राजा ठाकूर यांना उत्स्फुर्त प्रतिसाद

प्रशासन अपयशी ठरले. रस्ते, पाणी प्रश्न आजही सोडविण्यास ही यंत्रणा अपयशी ठरली. सत्तेत असणाऱ्यांनीदेखील सर्वसामान्यांना वेठीस धरण्याचे काम केले, त्यामुळे राजाभाऊ ठाकूर यांनी या दंडेलशाहीविरोधात आवाज उठविला आहे. राजाभाऊ ठाकूर हे माजी आमदार दिवंगत मधुकर ठाकूर यांचे सुपूत्र आहेत. आपल्या वडीलांचा वारसा घेत जनसामान्यांसाठी काम करणारे ते एक कृतीशिल नेतृत्व आहे. सत्तेत नसतानाही जनसामान्यांचे प्रश्न सोडविण्याचे काम त्यांनी केले. त्यामुळे सर्वसामान्यांच्या ते कायमच पसंतीला उतरत आहेत. जिल्हा काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष राजाभाऊ ठाकूर यांची जिल्हा परिषदेच्या आवास मतदार संघातून महाविकास आघाडीतील काँग्रेसचे उमेदवार म्हणून निवड जाहीर करण्यात आली. शेकाप सरचिटणिस जयंत पाटील यांची त्यांनी सोमवारी (दि.२०) सकाळी शेकाप भवन येथे भेट घेतली. यावेळी जयंत पाटील यांनी राजाभाऊ ठाकूर यांना पाठींबा दर्शविला.

राजाभाऊ ठाकूर यांची जिल्हा परिषदेच्या आवास मतदार संघातून उमेदवारी जाहीर झाल्याने कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण झाला आहे. त्यांना कार्यकर्त्यांकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र आहे. जनसामान्यांमध्ये राहणारे व्यक्तीमत्व म्हणून ओळखले जाणारे राजाभाऊ ठाकूर भरघोस मतांनी निवडून येतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

### अधिकारी थंडाव्यात, जनता उकाड्यात

लागला आहे. त्यामुळे नियमबाह्य वातानुकूलित यंत्रे हटवावीत आणि दोषी अधिकाऱ्यांवर महाराष्ट्र सेवा शिस्त व अपील नियमांनुसार कडक शिस्तभंगाची कारवाई करावी. सामान्य नागरिकांना वेळेत न्याय व सेवा मिळेल याची हमी द्यावी, अन्यथा हा प्रश्न राज्यव्यापी आंदोलन व न्यायालयीन लढ्याद्वारे पुढे नेण्यात येईल, असा इशाराही अमोल सांगळे यांच्याकडून देण्यात आला आहे.

यासंदर्भात रायगड जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागामार्फत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सर्व खातेप्रमुख तसेच पंचायत समितींच्या गट विकास अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. ही बाब गंभीर असून, शासनाच्या आदेशांचे उल्लंघन होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच, महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव यांना अमोल किसन सांगळे यांनी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने ही कार्यवाही करण्यात आली असून, त्याची प्रत आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी संबंधितांना पाठविण्यात आली आहे. त्यामुळे शासन आदेशांची तातडीने अंमलबजावणी करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

### ‘नाईट महाराष्ट्र’चा पर्दाफाश

घरासमोर विनापरवाना मटका जुगार सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार सोमवारी सायंकाळी सव्वासहा वाजताच्या सुमारास पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकत कारवाई केली आहे. या कारवाईत पोलिसांनी महेश घनश्याम जाधव आणि रशीद ऊर्फ काळया रफीक शेख या दोघांना ताब्यात घेतले आहे. तसेच, घटनास्थळावरून एकूण १ हजार ५५० रुपये रोख रक्कम आणि जुगारासाठी वापरले जाणारे साहित्य जप्त करण्यात आले आहे. याप्रकरणी म्हसळा पोलीस ठाण्यात दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार एन.डी. देवडे करत आहेत.

# नवसाला पावणारा चिरनेरचा श्री महागणपती



**दत्तात्रेय म्हात्रे**

महाराष्ट्रात व देशात आज अनेक पुरातन गणेश मंदिरे आहेत. आणि त्यातून गणेशाची विविध गोजिरवाणी रूपे पहावयास मिळतात. महाराष्ट्रातील अष्टविनायक गणेश दर्शन आता सर्वदूर प्रसिद्ध पावले आहे. या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील ऐतिहासिक चिरनेर गावातील श्री महागणपती गणेश मंदिर आता सर्व दूर प्रसिद्ध पावले आहे. या गणरायाच्या आगळ्यावेगळ्या व भव्य तसेच देखण्या रूपामुळे महाराष्ट्रात अष्टविनायकानंतर नववा गणपती असा आज बोलबाला होऊ लागला आहे.

चिरनेरच्या ऐतिहासिक भूमीला प्राचीन देवस्थानचा परिसर झाला आहे. श्री महागणपतीचे देवस्थान अत्यंत पुरातन असून पेशवेकालीन मंदिरात श्री महागणपती विराजमान आहेत. पेशव्यांच्या काळात महाराष्ट्रात अनेक ठिकाणी गणेशाची मंदिरे उभारण्यात आली. चिरनेर येथील गणेश मंदिर हेमाडपंथीय धाटणीचे दिसून येते. देवगिरीच्या रामदेवरायांचे हेमाडपंत हे प्रधान होते. त्यांनी विशिष्ट प्रकारची देवळे बांधण्याचे स्थापत्य प्रगत केले. देऊळ बांधताना चुना मातीचा वापर न करता दगडी चिऱ्यांचा उपयोग करून, देवळांची निर्मिती केलेली आहे. या पद्धतीला हेमाडपंथीय हे नाव रूढ झाले आहे. शास्त्रशुद्ध पद्धतीने बांधल्या मंदिराच्या आतील गाभाऱ्यात वरच्या कळसाच्या बाजूस अष्टकोनी नक्षीकाम साधून, कमळ पाकळ्यांनी घुमटीचा आकार घेतला आहे. त्यामुळे त्यात घुमणारे ओमकार व शंख नाद एक वेगळेच चैतन्य निर्माण करते. गणरायाची मूर्ती पूर्वाभुमिख असून डाव्या सोंडेची आहे. अतिशय लोभस वाणी आणि अष्टविनायकाचा विचार करता भव्य असणाऱ्या या गणपतीची पूजा श्रीमंत पेशव्यानी केल्याचा उल्लेख मराठी शाहित सापडतो. चिरनेर येथील महागणपतीचे तीर्थस्थान हे पेशवेकालीन असल्याचा दाखला मिळत असला तरी गणेश मंदिर हे पेशवेकालीन असून, महागणपतीची मूर्ती अत्यंत पुरातन असल्याचे दिसून येते. महागणपतीचे पूर्वीचे मंदिर तत्कालीन मुस्लिम अक्रमकांनी उध्वस्त केले. मात्र तत्पूर्वी भाविकांनी महागणपतीची मूर्ती मंदिरा जवळच्या तलावात लपवून ठेवली होती. कालांतराने पेशव्यांचे सरदार रामजी महादेव फडके यांना महागणपतीने दृष्टांत दिल्यानंतर त्यांनी महागणपतीची मूर्ती तलावातून बाहेर काढून सध्याच्या मंदिरात श्रींची मूर्तीची प्रतिष्ठापना केली आहे. नानासाहेब पेशवे हे महागणपतीला आपले आराध्य दैवत मानत. त्यांनी गणपती उत्सव सुरू केला. माघ उत्सवातील चतुर्थीला येथे श्री गजानन प्रत्यक्ष भोजनास येतात. अशी श्रद्धा असल्याने या दिवशी भक्तांची गर्दी असते. या दिवशी श्रींना महानैवद्य आणि त्याच दिवशी सर्व गणेश भक्तांना महाप्रसाद लाभ दिला जातो. उत्सवानिमित्त चिरनेरच्या नागरिकांनी भक्तांच्या स्वागतासाठी जागोजागी स्वागत फलक उभे केले आहेत. तसेच विविध महत्त्वाच्या ठिकाणी स्वागत कमानी देखील उभारल्या आहेत. हे गणपती देवस्थान अत्यंत जागृत असून या ठिकाणी आलेल्या भक्तांची दुःख निश्चित दूर होतात, अशी श्रद्धा आहे.

# आदर्शने ओलांडला एक हजार कोटींचा टप्पा

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**




आदर्श नागरी सहकारी पतसंस्था, अलिबाग या संस्थेने एक हजार कोटी रूपयांचा एकत्रीत व्यवसायाचा टप्पा ओलांडला आहे. एक हजार कोटी रूपयांचा पल्ला गाठणारी आदर्श ही रायगड जिल्ह्यातील पहिली पतसंस्था ठरली असल्याची माहिती आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक सुरेश पाटील व अध्यक्ष अभिजित पाटील यांनी बुधवारी (दि.२१) पत्रकार परिषदेत दिली. आदर्श पतसंस्था बँकींग क्षेत्रात आता अर्बन बँकांप्रमाणे काम करत आहे. आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेची स्थापना १९९८ रोजी झाली. अवघ्या २७ वर्षांमध्ये रायगड जिल्ह्यात १००३ कोटी रूपयांचा व्यवसाय पूर्ण केला आहे. ठेवी रु.५५८ कोटींच्या असून रु. ४४५ कोटीं रूपयांचे कर्ज वाटप करण्यात आले आहे. २०२४-२०२५ या आर्थिक वर्षापर्यंत आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेने रु. ७५२ कोटी ७७ लाख रूपयांचा एकत्रित व्यवसाय केला होता. मार्च २०२६ पर्यंत रु.१००० कोटी रूपयांचा एकत्रीत व्यवसाय करण्याचे आम्ही उद्दीष्ट ठेवले होते. परंतु सभासदांनी संस्थेवर अतूट विश्वास दाखवला म्हणून दहा महिन्यात आम्ही २५० कोटी रूपयांचा एकत्रीत व्यवसाय केला. आज आदर्शचा एकत्रीत व्यवसाय १००३ कोटी रूपयांचा झाला आहे. संस्थेचा रु. १००३ कोटी रुपयापेक्षा जास्त एकत्रित व्यवसाय असूनही ग्रॉस एन.पी. ए प्रमाण एक टक्क्यापेक्षा कमी असलेली आदर्श ही राज्यात अग्रगण्य पतसंस्था आहे.

आदर्शचे कार्यक्षेत्र राज्यस्तरीय आहे. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, ठाणे, पुणे, मुंबई या जिल्हांमध्ये कार्यक्षेत्र आहे. आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेच्या एकूण २२ शाखा आहेत. एक स्वतंत्र गोल्ड शाखा सुरू केली. दोन शाखा पुण्यात आहेत. पुण्यातील एक पतसंस्थेचे विलीनीकरण केले. या सर्व शाखा नफ्यात आहेत. सर्व शाखांच्या व्यवसायात वाढ झाली आहे. त्यामुळे आम्ही १००३ कोटी रूपयांचा व्यवसायाचा टप्पा गाठू शकलो. भविष्यात राज्यातील पहिल्या पाच पतसंस्थामध्ये आदर्शला नेण्याचे आमचे उद्दीष्ट आहे, असे संस्थापक सुरेश पाटील यांनी सांगितले. कर्ज वसूली करताना कोणत्याही प्रकारची तडजोड केली नाही. आदर्श परिवारातील प्रत्येक कर्मचाऱ्याने स्वतः ला झोकून देऊन काम केले. त्यांची मेहनत, संस्थांपकांची इच्छाशक्तीमुळे हा पल्ला गाठता आला. आदर्श पतसंस्था वित्तीयदृष्ट्या सुदृढ आणि सुव्यवस्थापित (एफएसडब्ल्यूएम) आहे. ३१ मार्च २०२६ पर्यंत आदर्शचा ग्रॉस एन.पी.ए ०१ टक्क्यापेक्षा कमी ठेवण्याचा आमचा प्रयत्न आहे, असे आदर्शचे अध्यक्ष अभिजीत पाटील यांनी सांगितले. सर्व शाखांमधील कर्मचाऱ्यांनी प्रामणिकपणे काम केले. ठेवी जमा केल्या, चांगली कर्ज वसूली केली. सभासदांना चांगली सेवा दिली, ग्राहकांचा विश्वास संपादीत केला.

## राष्ट्रीय मतदार दिवस कार्यक्रमाचे आयोजन

**अलिबाग :** भारत निवडणूक आयोग व मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी दिलेल्या निर्देशानुसार राष्ट्रीय मतदार दिवसाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांच्या अध्यक्षतेखाली रविवार (दि.२५) जानेवारी रोजी सकाळी ११.०० वा. जिल्हाधिकारी कार्यालय, नियोजन भवन येथे राष्ट्रीय मतदार दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती उपजिल्हाधिकारी व उपजिल्हा निवडणूक अधिकारी नितीन वाघमारे यांनी दिली आहे.

## उरणमध्ये रंगणार उडान महोत्सव

**| उरण | प्रतिनिधी |**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालय उरण व उरण एज्युकेशन सोसायटीचे मॅनेजमेंट आणि टेक्नॉलॉजी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई विद्यापीठाच्या अजीवन अध्ययन व निरंतर शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित उडान महोत्सव २०२६ हा शुक्रवारी (दि.२३) जानेवारी रोजी संपन्न होणार आहे. विद्यार्थ्यांमधील विविध कलागुणांना व गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यासाठी उडाण महोत्सवाचे आयोजन विद्यापीठाच्या वतीने करण्यात येते. या महोत्सवात पोवाडा गायन, पथनाट्य, पोस्टर मेकिंग, वक्तृत्व आणि क्रिएशन रायटिंग या विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवाचे उद्घाटन मुंबई विद्यापीठाच्या अजीवन अध्ययन व निरंतर शिक्षण विभागाचे संचालक डॉ. बळीराम एन.गायकवाड यांच्या हस्ते होणार आहे.यावेळी चंद्रकांत ठक्कर, प्रकाश मुथा, प्राचार्य डॉ. वाल्मिक गर्जे, प्राचार्या डॉ.मीनाक्षी गुप्ता, मिलिंद पाडगावकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या महोत्सवाच्या आयोजनासाठी प्रा.व्हि.एस. इंदुलकर हे परिश्रम घेत आहेत. या महोत्सवात उत्तर रायगड जिल्हा व नवी मुंबई परिसरातील एकूण २५ महाविद्यालयातील ३५० पेक्षा जास्त विद्यार्थी सहभागी होणार आहेत. हा महोत्सव यूईएस महाविद्यालयाच्या परिसरात संबंध होणार आहे. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.रवींद्र कुलकर्णी यांनी या महोत्सवास शुभेच्छा दिल्या आहेत.

# महाडमध्ये समतादुतांची राज्यस्तरीय कार्यशाळा

**| महाड | प्रतिनिधी |**



डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी, पुणे संस्थेच्या वतीने दिनांक १९ व २० जानेवारी रोजी समतादूत व प्रकल्प अधिकारी यांची दोन दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळा क्रांतीभूमी महाड, जिल्हा रायगड येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक महाड येथे आयोजित करण्यात आली या कार्यशाळेचे दुरुस्तथ प्रणालीद्वारे उद्घाटन डॉ. कांबळे यांच्या हस्ते झाले.

यावेळी बार्टी संस्थेचे महासंचालक सुनील वारे, निबंधक विशाल लोंढे, विस्तार व सेवा विभागाचे विभागप्रमुख डॉ. बबन जोगदंड, लेखाधिकारी नितीन चव्हाण, सहाय्यक लेखाधिकारी उल्हास शिंदे आदी उपस्थित होते.

डॉ बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक महाड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णकृती पुतळ्यास महासंचालक सुनील वारे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यशाळेला संबोधित करताना महासंचालक सुनील वारे म्हणाले की, महाड ही क्रांतिकारी भूमी असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी याच क्रांतीभूमीत चवदार तळ्याचा सत्याग्रह करून समता प्रस्थापित केली. तो लढा आपल्या सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. कार्यशाळेचे प्रास्ताविक विस्तार व सेवा विभागाचे विभाग प्रमुख डॉ. बबन जोगदंड करताना त्यांनी सर्व राज्यातील प्रत्येक तालुक्यात आपले समतादूत चांगले काम करत असून समतादूतांच्या कामात गतिशीलता येण्यासाठी महाड येथे दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केल्याचे सांगितले तसेच उल्लेखनीय काम करणाऱ्या समतादूत आणि प्रकल्प अधिकाऱ्यांचा प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करणार असल्याचे सांगितले.

# स्वीप अंतर्गत मतदार जनजागृती

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक-२०२६ च्या पार्श्वभूमीवर स्वीप कार्यक्रमांतर्गत मंगळवारी (दि.२०) रोजी आदिवासी वाडी, मेंदडीकोंड, ता. म्हसळा येथे मतदार जनजागृती रॅली कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचा मुख्य उद्देश मतदारांमध्ये मतदानाबाबत जागरूकता निर्माण करणे व शंभर टक्के मतदान साध्य करणे हा होता.

कार्यक्रमासाठी गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती म्हसळा साबळे, वरिष्ठ विस्तार अधिकारी पंचायत समिती म्हसळा अरविंद मोरे, झोनल ऑफिसर मेंदडी आनंद घरत, तसेच संपूर्ण स्वीप समिती उपस्थित होती.

रॅलीची सुरुवात मार्गदर्शकांच्या उपस्थितीत करण्यात आली. गावातील प्रमुख मार्गावरून रॅली काढण्यात आली. विद्यार्थ्यांनी व ग्रामस्थांनी हातात फलक घेऊन माझे मत-माझा हक्क, प्रत्येक मत अमूल्य आहे, लोकशाही मजबूत करा-मतदान करा अशा घोषणा देत जनजागृती केली. मार्गदर्शकांनी मतदारांना मतदानाचा अधिकार, मतदार नोंदणी प्रक्रिया, बाबत माहिती, तसेच निर्भय व नैतिक मतदानाचे महत्त्व समजावून सांगितले. नागरिकांनी कोणत्याही दबावाशिवाय मतदान करावे व लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा असे आवाहन केले.

या रॅलीला मतदारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. महिलावर्ग, युवक व ज्येष्ठ नागरिकांचा मोठा सहभाग लाभला. कार्यक्रमामुळे मतदारांमध्ये सकारात्मक जागृती निर्माण झाली. त्यामुळे आगामी निवडणुकीत शंभर टक्के मतदान करण्याचा संकल्प व्यक्त केला. एकूणच स्वीप अंतर्गत आयोजित मतदार जनजागृती रॅली अत्यंत यशस्वी ठरली. मार्गदर्शकांचे मोलाचे मार्गदर्शन, स्वीप समितीचे नियोजन व ग्रामस्थांचा सहभाग यामुळे लोकशाही मूल्यांची जाणीव अधिक दृढ झाली.




# निवडक



## तळ्यात कविता वाचनाचे आयोजन

**तळा :** महाराष्ट्र शासनाच्या मराठी विभाग समितीच्या शासन निर्णयानुसार जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स, तळा येथे १४ ते २८ जानेवारी या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत मंगळवारी ( दि.२०) जानेवारी रोजी कविता वाचन हा उपक्रम उत्साहात पार पडला. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुरुषोत्तम मुळे होते. यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सचिन बंगाळे, जयदिप देवरे, डॉ. विजय रायकर, प्रा. मनस्वी वाढवळ, डॉ. शेख, कुणाल जाधव, प्रणय भोगटे, अतुल खैरे, जयदिप रिसबूड आणि सृष्टी मोहिते उपस्थित होते. प्रा ढवण, प्रा अभंगे, प्रा निकम, प्रा, तरटे, प्रा. ठाकूर, प्रा शेख यांनी बा. भ. बोरकर, ना. धो. महानोर, सुरेश भट, शांता शेळके, बहिणाबाई या जेष्ठ कवी-कवियात्रीच्या कवितांचे वाचन केले. तसेच पुरुषोत्तम मुळे यांनी स्वरचित कविता सादर केल्या. महाविद्यालयातील विद्यार्थी व कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून विविध आशयपूर्ण कवितांचे वाचन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाचे ग्रंथपाल ढवण एस. के. यांनी केले, तर आभार प्रदर्शन तरटे व्ही. ए. यांनी मानले.

## ठकुबाई मुंबईकर यांचे निधन



**उरण :** उरण तालुक्यातील वेश्वी गावचे सामाजिक कार्यकर्ते राजू मुंबईकर यांच्या मातोश्री ठकुबाई बळीराम मुंबईकर यांचे सोमवार (दि .१९) जानेवारी रोजी वयाच्या ८० व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात त्यांचे पाच मुलगे, सुना, नातवंडे, पतवंडे असा मोठा गोतावळा आहे. ठकुबाई यांचा होमविधी शुक्रवार (दि .२३) जानेवारी रोजी तर दशक्रियाविधी बुधवार (दि .२८) जानेवारी रोजी श्रीक्षेत्र माणकेश्वर उरण येथे होणार आहे आणि उत्तरकार्यविधी शुक्रवार (दि.३०) जानेवारी रोजी त्यांच्या राहत्या घरी उरण-वेश्वी येथे होणार आहे.



## भिमराज मोरे यांची सेवापूर्ती उत्साहात

**माणगाव :** माणगाव तालुक्यातील इंदापूर गावचे रहिवाशी व खर्डी बुद्रुक आदिवासीवाडी शाळेचे शिक्षक भिमराज रघुनाथ मोरे हे शनिवार दि.३१ जानेवारी रोजी सेवानिवृत्त होत असून त्यांचा सेवापूर्ती सत्कार सोहळा बुधवारी (दि.२१) जानेवारी रोजी राजिप शाळा उतेखोल माणगाव येथे उतेखोल केंद्राचे केंद्रप्रमुख शंकर शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत आनंदमय व दिलखुलास अशा कौटुंबिक वातावरणात उत्साहात संपन्न झाला. यावेळी शिक्षक भिमराज मोरे यांना उपस्थित केंद्रप्रमुख शंकर शिंदे, अमित पानसरे, विनया जाधव, रमेश उभारे, भिमराज मोरे यांच्या पत्नी पूनम मोरे यांच्यासह उपस्थित अनेक शिक्षक भगिनींनी सेवानिवृत्तीच्या भरभरून शुभेच्छा दिल्या. यावेळी सेवानिवृत्त शिक्षक भिमराज मोरे यांनी आपल्या मनोगतातून आपल्या शिक्षकी पेशेच्या ३० वर्षाच्या कार्याची माहिती देत वेगवेगळे अनुभव सांगत आपला कौटुंबिक सेवापूर्ती सोहळा अयोजित केल्याबद्दल उतेखोल केंद्राचे तसेच उपस्थित केंद्रप्रमुख व सर्व शिक्षकांचे मनापासून आभार व ऋण व्यक्त केले. या कार्यक्रमास संगीता उभारे, सुनीता पिंगळे, नंदिनी वाले, सुदर्शन वाघोरकर, अजित शिंदे, वेव्हल, सायली अंबुर्ले यांच्यासह शिक्षक बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विनया जाधव यांनी करून कार्यक्रमाची उत्साहात सांगता केली.

## वसंत घरत यांचे निधन



**खरोशी :** पेण तालुक्यातील डावरे येथील निवृत्त पोलीस असिस्टंट इन्स्पेक्टर वसंत शंकर घरत यांचे वयाच्या ८० व्या वर्षी मंगळवारी (दि.२०) रोजी रात्री निधन झाले. एक मनमिळाऊ, शांत स्वभावाचे होते, पोलीस खात्यात त्यांना बापू या नावाने संबोधित होते, वयाच्या १८ व्या वर्षी आपल्या सेवेची सुरुवात केली, एकूण ४० वर्ष पोलीस खात्यात त्यांनी आपले योगदान दिले. अलिबाग, उरण, पनवेल, कळंबोली, ठाणे येथे आपली प्रदीर्घ सेवा करून निवृत्त झाले, त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले सुना, तीन मुली, नातवंडे जावई, असा मोठा परिवार आहे.

## खाडी पुलाजवळ आढळला इसमाचा मृतदेह

**पनवेल :** वडघर खाडी पुलाजवळ एका अनोळखी इसमाचा मृतदेह आढळला असून, त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. या इसमाचे वय अंदाजे ४५ ते ५० वर्ष, रंग गोरा, बांधा मजबूत, अंगात नेसून हिरवट रंगाचा हाफ बाह्यांचा गोल गळ्याचा टी शर्ट, राखाडी रंगाची फुल नाइट पॅन्ट आहे. याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा सपोनि प्रवीण फडतरे यांच्याशी संपर्क साधावा.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- बागायती वाडी विक्री -१३ गुंठे (घर, नारळ, सुपारी, विहीर) @ २७ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक - सुहास माळी गाव- थळ, गुंजाळ आळी, अलिबाग मो. - ८७७९८०५३५३
- नागाव मधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे . रिसेप्शनिस्ट, कॉन्टिनेंटल, मेन्टेनन्स १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२
- सिव्हील इंजिनियरींग ऑफिसमध्ये कामाकरीता ड्राफ्टसमन (Autocad) पाहिजे. फोन नं. ८३०८२००७७७/७७५८०६४७७३/९६६५०६७९१७
- एजन्सीमध्ये कम्प्युटरवर काम करण्यासाठी मुलगी पाहिजे. टॅली-जीएसटी आवश्यक. ९७६५०५०२६३.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# रस्त्यालगत कंटेनरची जीवघेणी पार्किंग

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल तालुक्यातील कोन-सावळा मार्गे रोडवर मोठमोठे गोडाऊन लॉजिस्टिक असल्या कारणाने रात्री त्या कंटेनरची रस्त्यालगत पार्किंग केली जाते. त्यामुळे याचा त्रास प्रवासी, स्थानिकांना होत आहे.

कोन-सावळामार्गे जाणारा रस्ता हा सध्या लॉजिस्टिक आणि गोडाऊनचे मोठे केंद्र बनले आहे. यामुळे रात्रीच्या वेळी रस्त्याच्या दुतर्फा होणारी कंटेनरची पार्किंग ही केवळ वाहतुकीसाठी अडथळा नसून अपघातांनाही निमंत्रण देणारी ठरत आहे.या समस्येमुळे प्रवाशांना आणि स्थानिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रात्रीच्या वेळी अंधारात उभे असलेले कंटेनर नीट दिसत नाहीत, ज्यामुळे दुचाकी आणि चारचाकी वाहनांचे भीषण अपघात होऊ शकतात. यापूर्वी झालेले देखील आहेत पण त्याकडे दुर्लक्ष केले जाते. अनेक गोडाऊन मालकांकडे स्वतः ची पुरेशी पार्किंग नसल्यामुळे ते सार्वजनिक रस्त्याचा वापर करतात. यावर उपाययोजना करणे गरजेचे आहे. स्थानिक ट्राफिक पोलीस याकडे दुर्लक्ष करताना दिसत आहेत. अजून किती अपघात हवेत, असा प्रश्न विचारला जात आहे.


## जाहीर नोटीस

सदरील नोटीशीद्वारे सर्वांना सूचीत करण्यात येते की, माझ्या अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली जमीनमिळकत संदर्भित जमीनमिळकतीचे विद्यमान मालक १) श्रीमती. पूर्वी निखील शहा, २) श्री. निल निखील शहा व ३) कु. नुपूर निखील शहा, यांच्याकडून कायमस्वरूपी व कायदेशीरपणे विकत घेण्याचे ठरविलेले आहे व तशी प्राथमिक बोलणी माझे अशील व विद्यमान मालक यांचे दरम्यान पूर्ण झालेली आहेत. संदर्भित जमीनमिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी, बोजाविरहीत व निर्वेध तसेच कोणत्याही प्रकारे अबाधित असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे. असे असून देखील संदर्भित जमीनमिळकतीमध्ये जर कोणत्याही व्यक्तीचे/व्यक्तींचे खरेदीखत, करार, भाडेपट्टा, बक्षिस, गहाणखत इत्यादीद्वारे व इतर कसल्याही कराराद्वारे वा दस्ताद्वारे प्राप्त होणारे कायदेशीर हक्क/अधिकार वा हितसंबंध असतील तर अशा व्यक्तीने/व्यक्तींनी त्या आशयाची लेखी हरकत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत माझ्या खालील नमूद पत्त्यावर पाठवून द्यावी. विहित मुदतीनंतर आलेली कसलीही हरकत/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व माझे अशिल संदर्भित जमीनमिळकतीचा व्यवहार अंतिमत: पूर्ण करतील याची कृपया नोंद घ्यावी.

**-: संदर्भित जमीनमिळकतीचे परिशिष्ट :-**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| म्हात्रोळी, ता. अलिबाग, जि. रायगड. | २३३ | ०-३६-१० | ४.०० |

अलिबाग,
दिनांक २२/०१/२०२६.

**राजेंद्र दा. पाटील,**
ॲडव्होकेट.
कृष्णवंदन - २, ब्राम्हणआळी,
कन्याशाळेसमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड,
मो. ९८२२५२८९३१
ईमेल- adv.rdpatil@gmail.com

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे आशिल यांनी खालील वर्णनाच्या जमीन मिळकतीचे जमीन मालक श्री.महेशकुमार चमनलाल, राहणार :- बी ३७, दुसरा मजला, न्यु मुनतान नगर दिल्ली ११००५६ यांच्याकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे चाफेवाडी, ता. कर्जत, जि. रायगड**

| स.नं. | हि.नं. | हे. आर. पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| १५ | २ | १-६८-०० | ०-९७ |

सबब सदर मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही, गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज, तबदील ट्रस्ट, कुळअखत्यारपत्र, बयानापावती हक्क हितसंबंध असल्यास संबंधितांनी आपआपल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार यांचेकडे अगर खालील नमूद केलेल्या पत्त्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यांसहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात अथवा प्रत्यक्ष भेट घ्यावी. याप्रमाणे कोणाचीही वरील मुदतीत तक्रार आली नाही. तर सदर मिळकत ही निर्वेध, बोजारहीत व खरेदी घेण्यास योग्य आहे असे समजून सर्व संबंधितांनी आपापल्या तथाकथीत हरकती व तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत असे समजून पुढील खरेदीचा व्यवहार आमचे आशील पुर्ण करतील याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

दि. २२/०१/२०२६
सही/-
**(ॲड. विलास दौलत ऐनकर)**
मु.पो. खांडस, ता. कर्जत, जि. रायगड
मोबाईल नं.९८८१२९८३३८/९५७९८८०१९८

## जाहिर नोटिस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, विद्यमान जमिन मालक श्रीमती रंजना राजेंद्र भांगले, श्री. गोपीचंद राजेंद्र भांगले, सौ. भगवती चेतन पवार यांचेसोबत ताबेकब्जातील व वहिवाटीतील त्यांचे कायदेशीर मालकी हक्कातील व हिश्यातील खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन आमचे अशिलांनी त्यांचेकडुन कायमस्वरुपी खरेदी करण्याचा व्यवहार ठरविला आहे. सदरहु जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मौजे खांडस, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र हे. आर. | आकारणी रु. पै |
|---|---|---|---|
| ७६ | ७/ब | ०.८०.०० हे.आर.चौ.मी. एकुण क्षेत्र मिळकतीचे खरेदीखत | ०.७४ |

वरील वर्णनाच्या जमिनीचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहिवाट वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासहित सदर नोटीस झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर जमीन निर्वेध व बोजारहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालकाबरोबर पुर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत,
दिनांक : २२/०१/२०२६

**ॲड. मोनाली रामदास हजारे**
एम.कॉम.एल.एल.बी.
पत्ता: दहिवली, ए. व्ही. एफ. रेसिडेन्सी,
ललानी रोड, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं. ९२६०१०९२८२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत तिचे मालक श्री. दिपक विष्णु बोराडे, रा. धाकटे वेणगांव, ता कर्जत, जि. रायगड यांचेकडुन कायमची खरेदी करणेचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे वदप आदिवासीवाडी, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (चौ.मी.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| १० | ७३ | ४४५.९३ | ४५.०० |

सदर मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहित आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

दि. २२/१/२०२६

**ॲड. कैलास गणपत मोरे**
बी.एल.एस, एलएल. बी
प्रभात अपार्टमेंट रूम नं. ४ दुसरा मजला
सुनिल चिक्कीजवळ ता. कर्जत जि. रायगड
मो. नं. ९९६०८३८१६४/९०२८५०८४९६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक तुप्ती भागवत गावंडे, मनिषा संभाजी यादव, प्रमिला जिवराज महाजन यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार मालक तुप्ती भागवत गावंडे वर्णन पुढीलप्रमाणे मौजे जांभिवली तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर ९/२, ९/३, ९/४ व मालक मनिषा संभाजी यादव वर्णन पुढीलप्रमाणे मौजे जांभिवली तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर १०/२, १२/१, १२/१२, १२/२, १२/३, १२/५, १३/२, १३/३, १३/५, १३/६, १३/८, १४/१, ८/२, ९/१, ९/६, ९/७, ९/८ तसेच मालक प्रमिला जिवराज महाजन वर्णन पुढीलप्रमाणे मौजे जांभिवली तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर १०/१, १३/१ या सर्व मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक २२/०१/२०२६

**खरेदीदारातर्फे वकील ॲड. वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर,
अमराई रोड, कर्जत ता. कर्जत,
जि. रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील ॲड. निलेश कान्हू मोरे**
मोबा.९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत
गॅस समोर अमराई रोड, कर्जत ता. कर्जत,
जि. रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतींचे मालक श्री. दिपक बाळकृष्ण हवलदार हे त्यांचे मालकीची आहे असे सांगतात व विद्यमान कागदपत्रांवरुन तसे दिसते. सदर खाली नमुद क्षेत्राची मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्याचे ठरविले असून तशी बोलणी होऊन बयाणा रक्कम देवून व्यवहाराची निश्चिती झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे अलिबाग, सर्व्हे नं. २९/अ/१ पैकी भुखंड क्र.१०४, क्षेत्र ९४ चौ.मी. (कोकण गृहनिर्माण व क्षेत्र विकास योजनेतील)

तरी सदर मिळकतीच्या विक्री व्यवहाराबाबत कुणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर करावी. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही असे समजुन व गृहित धरून सदरचा विक्री व्यवहार पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : २०/०१/२०२६

**राजेंद्र म. माळी**
ॲडव्होकेट
''सार्थक'' प्लॉट नं. १३४, म्हाडा
कॉलनी, अलिबाग जि. रायगड.
मो.नं. ९९२१९७४२३४

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेल्या मिळकतीमधील विद्यमान मालक श्री अभिषेक अशोक गायकर व अशोक नारायण गायकर यांचे नावे सातबारा अभिलेखामध्ये दर्शविण्यात आलेले क्षेत्र खरेदी घेणेचा व्यवहार निश्चित केला आहे. सदर मिळकतीमधील हक्क हितसंबंध निर्वेध असल्याचा भरवसा सदर विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| भूमापन क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पैसे. |
|---|---|---|
| २२३६/१ | १-४६-७० | ७४-२२ |

पैकी श्री अभिषेक अशोक गायकर व अशोक नारायण गायकर यांचे नावे सातबारा अभिलेखात नोंदविण्यात आलेले ०-०५-६० हे.आर.चौ.मी., आकार रू.२-९० पै.

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट, दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून मिळकतीचे खरेदीखत पूर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :-१९/०१/२०२६

**ॲड. निलेश अशोक म्हात्रे**
'गुरूकृपा'अलिबाग अर्बन बँकेशेजारी, महर्षी कर्वे रोड,
मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहीर नोटीस दि. २२/०१/२०२६

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. राजाराम मुरलीधर जोशी यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरच्या मिळकतीच्या विक्री संबंधीत बोलणी विद्यमान मालक १) नंदा बळीराम कदम २) सुचिता रमाकांत घाग ३) स्मिता चंद्रकांत पवार ४) सिध्दी गणेश बने ५) चेतना चंद्रकांत मोकाशी ६) संजना सहदेव राणे ७) मेघना आशिष सावंत ८) महेश सदानंद जाधव यांचेसोबत झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| आंबेपूर ता. अलिबाग | ११३ | ०-७५-००<br>पो.ख. ०-१०-००<br>एकुण ०-७५-०० | १५.१९ |

वर वर्णन केलेली मिळकत हि या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु. पेझारी पो. पोयनाड
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा.नं. ९२७३२७३८४३/९६३७२७००१९

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे थळ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीच्या मालकांकडून खरेदी करण्याचा आमच्या अशिलांचा मानस आहे व त्या संबंधी उभयतांत बोलणी सुरु आहेत,

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | स.नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पै.) | मालकांची नावे |
|---|---|---|---|---|
| थळ | १८१/३ | ०-०३-००<br>पो.ख. ०-०३-३०<br>०-०६-३० | ०.१२ | १) ताहेर शब्बीर हबीब,<br>२) फातीमा ताहेर हबीब |

तसेच त्या मिळकतीमध्ये असलेले गट ग्रामपंचायत थळ, मालमत्ता क्र. १९०७ व १९०८ ही घरे.

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांचे निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमचे अशिलांस दिला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क - हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार ठरवतील आणि पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. २२/०१/२०२६

**ॲड. विधान अरविंद पाटील**
रा. वत्सला, टिळक रोड, स्टेट बँके समोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे तळवली तर्फे खंडाळे, ता.अलिबाग, जि. रायगड यांनी येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक १. सिंधु मोरेश्वर ठाकूर २. श्री. संदीप हरिश्चंद्र कावजी ३.श्री. विलास हरिश्चंद्र कावजी रा. धोलपाडा, पो.खंडाळे, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या नांवे असलेल्या मालकी हक्काची व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेली भातशेती मिळकत माझे स्नेही यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| तळवली तर्फे खंडाळे ता. अलिबाग | १६१ | ०-८६-४०<br>पो.ख. ०-०९-७०<br>एकूण ०-९६-१० | २१.८८ |

वर नमूद मिळकतीपैकी १. सिंधु मोरेश्वर ठाकूर २. श्री. संदीप हरिश्चंद्र कावजी ३. श्री. विलास हरिश्चंद्र कावजी यांचे मालकीहक्कातील व ताबेकब्जा वहिवाटीतील क्षेत्र ०-४६-४० हे. आर., पो.ख. ०-०९-७० हे.आर., एकूण क्षेत्र ०-५६-१० हे.आर., आकार रु. ११.७५ पैसे या मिळकतीपैकी ०-४०-०० हे. आर. मिळकतीबाबत.

सबब सदरहू जागा, जमिन व मिळकतींमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे निर्वेध व बोजारहित आहेत व हरकत असल्यास ती सोडून दिली आहे. असे गृहीत धरुन आमचे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती आमच्या स्नेहींवर बंधनकारक राहणार नाहीत.

दिनांक : २१/०१/२०२६
सही/-
**शेखर विष्णू मगर**
पत्ता : - दुय्यम निबंधक कार्यालयासमोर,
अलिबाग ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे तळवली तर्फे खंडाळे, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री. कृष्णा राघो वर्तक रा. सागाव, पो. खंडाळे, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या नांवे असलेल्या मालकी हक्काची व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेली भातशेती मिळकत माझे स्नेही यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| १. तळवली तर्फे खंडाळे ता. अलिबाग | १३० | ०-२५-००<br>पो.ख. ०-०३-३०<br>एकूण ०-२८-३० | ६.२५ |
| २. तळवली तर्फे खंडाळे ता. अलिबाग | १३५/२ | १-१८-००<br>पो.ख. ०-१७-५०<br>एकूण १-३५-५० | १९.२० |

**वर नमूद अनुक्रमांक १ कडील संपूर्ण मिळकत व अनुक्रमांक २ कडील भातशेती मिळकतीपैकी श्री. कृष्णा राघो वर्तक यांचे मालकीहक्कातील व ताबेकब्जा वहिवाटीतील ०-३१-७० हे. आर. मिळकत.**

सबब सदरहू जागा, जमिन व मिळकतींमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे निर्वेध व बोजारहित आहेत व हरकत असल्यास ती सोडून दिली आहे. असे गृहीत धरुन आमचे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती आमच्या स्नेहींवर बंधनकारक राहणार नाहीत.

दिनांक : २१/०१/२०२६
सही/-
**शेखर विष्णू मगर**
पत्ता :- दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहिर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

खालील वर्णनाची जमीन मिळकती या श्री. प्रणव श्रीकांत गुप्ते व इतर यांच्या नावे असून सदरच्या जमिन मिळकती या आमचे अशिलांने विकत घेण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे चेहेर ता. मुरूड-जंजिरा जि रायगड.**

| अ.क्र. | मौजे | भुमापन क्र. | क्षेत्र | आकार | लागवट |
|---|---|---|---|---|---|
| १. | चेहेर | ३९/१० | ०.८८.०० | ०.६९ | गवतपड |
| २. | चेहेर | ३६/१/फ | ०.२८.०० | ०.३५ | भात |
| ३. | चेहेर | ३६/१/ड | ०.१४.५० | १.१९ | भात |
| ४. | चेहेर | ३५/१/ब | १.९३.५० | १०.०७ | गवतपड |

वरील नमुद मिळकती निर्वेध असल्याचा निर्वाळा करून घेण्याकरीता सदरची नोटीस देण्यात येते आहे. तरी देखील या मिळकतीमध्ये इतर कोणाचेही गहाण दान, लिज, फरोक्त, भागीदार, बक्षिस, मृत्यूपत्रांकित दान, ताबेकब्जा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी, हक्क, लिन, इजमेंटरी हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास तसेच या मिळकतीबाबत कोणत्याही ठिकाणी वाद तंटे चालु असल्यास अथवा या व्यवहाराला कोणतीही हरकत असल्यास त्यांनी आपली हरकत खाली सही करणारे ॲड. सचिन दत्तात्रेय पाटील यांचेकडे हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांत लेखी स्वरूपात पुराव्यासह दाखल करावी व त्याची पोच घ्यावी. या मुदतीमध्ये कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास वरील मिळकती निर्वेध व बोजविरहीत आहे असे समजून आमचे अशिल खरेदी-विक्री व्यवहार पुर्ण करतील. मागाहून येणाऱ्या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. कागदोपत्री पुरावा न जोडलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे,

ठिकाण :- मुरूड-जंजिरा
दिनांक :-२१/०१/२०२६
सही/-
**ॲड. सचिन दत्तात्रेय पाटील**
मु. येसदे, पो. वळके, ता. मुरूड, जि. रायगड.
ऑफिस पत्ता- आमली पेट्रोल पंप जवळ, मु. आमली
मो.नं. ९२०९७८७५५३/७०५७००३२६४

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक १) मदनमोहन बी इंगवले एच यु एफ कर्ता (मदनमोहन बी इंगवले) २) मेधा सुनिल गाडगीळ, ३) सुनिल कृष्णाजी परांजपे ४) निशिगंधा नितीन पाटील, ५) वृषाली प्रशांत राणे, ६) गीता दिनेश काटते यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे शेडाशी कातकरीवाडी तालुका पेण जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| १७/१ | एकुण क्षेत्र ६-२३-०० हे आर पॉ यापैकी वरील मालक यांचे क्षेत्र २-१५-१० हे आर पॉ | ४-०० |
| १७/१ | एकुण क्षेत्र ६-२३-०० हे आर पॉ यापैकी वरील मालक यांचे क्षेत्र ०-४०-०० हे आर पॉ | ४-०० |
| १७/२ | एकुण क्षेत्र ४-५५-०० हे आर पॉ | २-९४ |
| २७ | एकुण क्षेत्र ०-१०-९० हे आर पॉ | ०-११ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्तवा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २२/०१/२०२६

**खरेदीदारातर्फे वकील ॲड. वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर,
अमराई रोड, कर्जत ता. कर्जत,
जि. रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील ॲड. निलेश कान्हू मोरे**
मोबा.९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९. तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत
गॅस समोर अमराई रोड, कर्जत ता. कर्जत,
जि. रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

सर्वांना या नोटीसने असे कळविणेंत येत आहे की, जिल्हा रायगड, तालुका अलिबाग पैकी गांव काळोशी येथे खालील वर्णनाची मिळकत आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे-आर.पॉ.) | आकार |
|---|---|---|---|
| ७ | ० | ०-२८-१० | ३=६२ |

वर नमूद मिळकत मुरलीधर सदानंद राऊत, प्रभाकर सदानंद राऊत, अनंत सदानंद राऊत, माधुरी मारूती कुरूळकर, प्रतिभा प्रकाश चिंबुलकर, भाग्यश्री भारत मयेकर आणि मनस्वी मंगेश खोत या सर्वांची सामाईक मालकीची मिळकत असून, आमचे अशिलांनी संपूर्ण मिळकत विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर व्यवहार पूर्ण करणेपूर्वी सदर मिळकतीमध्ये त्रयस्थ व्यक्तीची काही जडजोखीम असल्यास त्याची माहिती मिळविण्याकरिता ही नोटीस देण्यांत येत आहे.

तरी, सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची सर्वानी नोंद घ्यावी.

तारीख: २२/०१/२०२६
सही/-
**ॲड. संजीव अनिल घरत**
ऑफीस पत्ता : मु. पो. खंडाळे,
तालुका अलिबाग, जिल्हा रायगड ४०२२०९

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे - राजेवाडी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील क्षेत्राचे वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) भावना भास्कर महाडीक, २) शैलेश भास्कर महाडीक, ३) निलेश भास्कर महाडीक ४) दिपाली चंदन म्हात्रे, यांचे कडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| राजेवाडी, ता. अलिबाग | ३९ | बागायत ०१-३३-००<br>पो.ख. ००-०४-८०<br>एकूण ०१-३७-८० | १७.२५ |

वर वर्णन केलेल्या मिळकती पैकी क्षेत्र ००.७२.७ हे.आर. मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

वर वर्णन केल्याप्रमाणे क्षेत्राची जमिन मिळकती ह्या त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहिवाटीतील असून, त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्या बाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीं वर अथवा तिचे कोणत्याही भागावार कोणतीही व्यक्ती वा संस्था कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचाकरार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरीहक्क, सरकारी, निम सरकारी संस्था यांचा बोजा थकबाकी या अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत आल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखीस्वरूपात आणून द्यावीत, मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकती विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काच्या आहेत व त्यावर अन्य कुणाचा ही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २१/०१/२०२६

**ॲड. राहुल रमेश नाईक**
मु. नागांव, ता. अलिबाग
मोबा. क्र. ९९२२७९८५२८

अर्जदारतर्फे वकील श्री. एस. एन. जोशी
दिनांक                    निशाणी क्र.

**अलिबाग येथील मे. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड, यांचे न्यायालयात,**
चौकशी अर्ज नं.१०८/२०२४

याकुब बेग ट्रस्ट ...अर्जदार
विरूद्ध
असिस्टंट चॅरिटी कमिशनर व इतर ...सामनेवाले

दिनांक ०५.१२.२०२५ रोजीच्या अंकामध्ये पृष्ठ क्र. ७ वर प्रसिद्ध झालेल्या जाहीर नोटीसचे शुद्धीपत्रक

याकूब बेग ट्रस्ट, पनवेल, रजिस्टर नं.बी-१०८ (के) रायगड, या ट्रस्टचे मुख्य विश्वस्त मंडळाची पुढील पाच वर्षांकरीता नेमणूक करावयाची असून, त्याकरीता अर्जदार न्यासाने मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड यांचे न्यायालयात सदरचा चौकशी अर्ज दाखल केला आहे. त्याकामी निशाणी १ वर मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांनी जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून ३० दिवसांचे आंत न्यासाच्या योजना नियम ३ व ४ प्रमाणे पात्र असलेल्या व्यक्तींकडून उमेदवारी अर्ज मागविणेसाठी रायगड जिल्ह्यात प्रसिद्ध होणाऱ्या स्थानिक दैनिक वर्तमानपत्रामध्ये जाहीर नोटीस प्रसिद्ध करणेचा आदेश दिनांक ०१.१२.२०२५ रोजी केलेला आहे. मात्र त्याप्रमाणे दिनांक ०५.१२.२०२५ रोजीच्या अंकामध्ये जाहीर नोटीस प्रसिद्ध करणेत आली. मात्र त्या जाहीर नोटीसमध्ये योजना नियम ३ चा उल्लेख केलेला नाही अशी हरकत दाखल झाली. मा. प्रमुख जिल्हा न्यायाधिश यांनी सदर नियम ३ चा उल्लेख करणारे शुद्धीपत्रक प्रसिद्ध करणेचा आदेश दिनांक १३.०१.२०२६ रोजी केला असून, हे शुद्धीपत्रक प्रसिद्ध झालेनंतर दिनांक ०९.०२.२०२६ रोजी अथवा तत्पूर्वी नियम ३ मध्ये नमूद केलेल्या व नियम ४ प्रमाणे पात्र असलेल्या उमेदवारास त्यांचे उमेदवारी अर्ज जिल्हा न्यायालयात त्या व्यक्तीने वर नमूद केलेल्या मुदतीत संपूर्ण नांव, वय, धंदा, राहाणेचा संपूर्ण पत्ता, वगैरे, आपले लायकीबाबत योग्य ती सर्व माहिती देऊन व विश्वस्त म्हणून नेमणूकीस लायक असल्याबाबतचा सर्व ती प्रमाणित कागदोपत्री पुरावा यासह, आपला उमेदवारी अर्ज मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड यांचे न्यायालयात दिवाणी चौकशी अर्ज क्र.१०८/२०२४ चे कामात दाखल करावा. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. मात्र दिनांक ०५.१२.२०२५ रोजीच्या जाहीर नोटीस प्रमाणे ज्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे त्यांनी पुन्हा स्वतंत्र उमेदवारी अर्ज दाखल करणेची गरज नाही याची स्पष्ट नोंद घेणेत यावी. योजना नियम ३ खालीलप्रमाणे-

३. प्रशासन- न्यासाची मिळकत ही ५ (पाच) विश्वस्त असणाऱ्या विश्वस्त मंडळामध्ये निहित होईल व त्या विश्वस्त मंडळाने त्या मिळकतीची व्यवस्था व कारभार पाहणेचा आहे. सदर विश्वस्त हे जिल्हा न्यायाधिश रायगड (कुलाबा), अलिबाग यांचे मार्फत निवडले जातील. सदर पाच विश्वस्तांपैकी तीन विश्वस्त हे न्यासाच्या संस्थापकाच्या म्हणजे याकूब बेग यांच्या कुटुंबातून निवडले जातील म्हणजेच संस्थापकाच्या तीन मुलांचे शाखेतून म्हणजे अहमद बेग, उस्मान बेग व युसूफ बेग यांच्या शाखेतून प्रत्येकी एक असा विश्वस्त निवडला जाईल. मात्र सदर तीन शाखांमधून अथवा कोणत्याही एक शाखेमधून जर कोणताही सक्षम व योग्य प्रतिनिधी उपलब्ध नसेल तर त्या जागी सुन्नी हनाफी मुस्लिम जमात मध्ये समाविष्ट असणाऱ्या व्यक्तींपैकी व्यक्ती अथवा व्यक्तींना तात्पुरते नेमले जाईल. उर्वरित दोन विश्वस्त हे सुन्नी हनाफी मुस्लिम जमात मध्ये समाविष्ट असणाऱ्या व न्यासाचे संस्थापकाचे कुटुंबियांशी कोणत्याही प्रकारचे नातेसंबंध नसणाऱ्या व्यक्तींमधून निवडले जातील. निवडले जाणारे पाचही विश्वस्त हे त्यांच्या निवडीपासून पुढील पाच वर्षांकरीता विश्वस्त म्हणून काम करू शकतील. मात्र ते पुन्हा नव्याने विश्वस्त निवडीकरीता अर्ज दाखल करणेस पात्र राहतील.

दिनांक ०५.१२.२०२५ रोजीच्या नोटीसमधील इतर सर्व मजकूर व विशेष करून घटना नियम ४ मधील पात्रता व अपात्राबाबतचे नियम हे तसेच्या तसेच राहतील. मात्र घटना/स्कीम नियम ४ मधील शर्ती व अटीनुसार विश्वस्त पदास काम करणेस या शब्दानंतर व नसलेल्या या शब्दापूर्वी, असलेल्या व हे दोन शब्द वाचणेत यावेत. तसेच अर्जदार न्यासाच्या विश्वस्तपदी होणारी नेमणूक ही अर्जदार न्यासासंदर्भात वक्फ न्यायाधिकरणाकडे प्रलंबित असलेल्या अपील क्र.२५/२०२५ चे निकालाचे अधीन राहील.

टीप - हे शुद्धीपत्रक प्रसिद्ध झाले नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

आज दिनांक २०/०१/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
कनिष्ठ लिपीक
जिल्हा न्यायालय, रायगड अलिबाग

सही/-
अधीक्षक
(न्याय विभाग)
जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग.

राजकीय फेरफटका

# माणुसकीचा आधार ‘माऊली’

## मोहन धुमाळ : विश्वास आणि कृतीचे नेतृत्व



काही माणसं अशी असतात की, त्यांना ओळख देण्यासाठी पदांची गरज लागत नाही. त्यांच्या नावापेक्षा मोठी असते त्यांची कामगिरी आणि त्यांच्या उपस्थितीपेक्षा अधिक बोलकी असते त्यांची माणुसकी. मोहन धुमाळ हे असेच व्यक्तिमत्त्व आहे, जे युवा, ज्येष्ठ, महिला आणि सामान्य नागरिक या सगळ्यांच्या मनात आपुलकीने घर करून आहे. म्हणूनच लोक त्यांना केवळ नेता म्हणून नाही, तर प्रेमाने ‘माऊली’ म्हणून ओळखतात.

सज्जनता, देवभोळेपणा आणि साधेपणा हे त्यांच्या स्वभावाचे स्थायी गुण आहेत. कोणताही दिखावा नाही, कुठलाही गाजावाजा नाही; पण मदत मात्र नेहमी पुढे. ‘माऊली’ ही हाक त्यांच्या नावाआधी आली नाही, ती त्यांच्या कृतीतून जन्माला आली. संकटात माणूस म्हणून उभे राहणारा, नाव न विचारता मदत करणारा आणि गरज संपली की शांतपणे बाजूला होणारा स्वभाव म्हणजेच लोकांच्या दृष्टीने माऊली.

अनेक विद्यार्थ्यांची फी त्यांनी स्वतः भरली. कित्येकांचे शिक्षण अर्ध्यावर थांबू नये म्हणून त्यांनी आधार दिला. कुठेही आपले नाव पुढे न करता ही मदत केली गेली, कारण त्यांच्यासाठी शिक्षण म्हणजे केवळ व्यक्ती घडवणे नव्हे तर, समाज घडवणे होते. म्हणूनच अनेकांच्या आयुष्यात ते शिक्षक नाही, पण माऊली ठरले.

अनेक कुटुंबांच्या घरांच्या उभारणीत त्यांची शांत मदत उभी आहे. कुणाच्या दुःखात फोटो काढले नाहीत, भाषण केले नाही, फक्त गरज होती तिथे माणूस म्हणून उभे राहिले. म्हणूनच लोक म्हणतात की, माऊली मदत करतो तेव्हा सांगत नाही, पण त्याची ऊब आयुष्यभर राहते.

शेतकरी हा त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. संकटाच्या काळात शेतकऱ्यांसाठी धावून जाणे, भात सेंटर उपलब्ध करून देणे, कष्टाचा मोबदला शेतकऱ्याच्या हातात यावा यासाठी प्रयत्न करणे हे त्यांच्या कामाचे भाग आहेत. शेतकऱ्यांसाठी ते नेता नाहीत, तर संकटात धावून येणारी माऊली आहेत. विद्यार्थ्यांसाठी सायकली मिळवून देणे असो किंवा युवकांसाठी रामराज प्रीमिअर लीगच्या माध्यमातून संधी निर्माण करणे असो, प्रत्येक ठिकाणी त्यांचा विचार एकच होता. आपले पोर पुढे गेले पाहिजे. नांगरवाडी येथे उभारलेले भव्य मैदान हे केवळ खेळाचे ठिकाण नाही, तर स्वप्नांना पंख देणारे व्यासपीठ आहे.

आरोग्याच्या बाबतीतही त्यांनी माणुसकी जपली. विभागासाठी ॲम्ब्युलन्स मिळवून देताना त्यांच्या मनात एकच विचार होता. वेळेवर मदत मिळाली तर एखादे आयुष्य वाचू शकते. अशा क्षणी लोकांना आठवते ती माऊली.

मोहन धुमाळ हे वरून पाहणारे नेतृत्व नाहीत. ते लोकांसोबत उभे राहणारे आहेत. युवा त्यांना मित्रासारखे मानतात, ज्येष्ठ त्यांच्याकडे आधार म्हणून पाहतात आणि सामान्य माणूस त्यांच्यात आपलाच माणूस पाहतो. म्हणूनच मोहन धुमाळ हे केवळ उमेदवार नाहीत.
ते अनेकांच्या शिक्षणाची माऊली आहेत.
ते अनेक घरांचा आधार आहेत.
ते शेतकऱ्यांच्या संघर्षातील सोबती आहेत.
ते युवकांच्या स्वप्नांची माऊली आहेत.
आणि म्हणूनच लोक प्रेमाने एकच हाक मारतात
माऊली.

**– विक्रांत नंदकुमार वार्डे**

**रायगड जिल्ह्यात येऊ घातलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीने पूर्ण ताकदीने निवडणूक मैदानात उतरण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. विविध ठिकाणी जोरदार शक्तिप्रदर्शन करत महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केल्याने जिल्ह्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, येणारी निवडणूक अत्यंत चुरशीची होण्याचे संकेत मिळत आहेत.**

# जिल्ह्यात महाविकास आघाडीचा झंझावात

## जोरदार शक्तीप्रदर्शन करीत उमेदवारी अर्ज दाखल

## पळस्पे मतदारसंघातील पाणी, पूर, प्रदूषणमुक्तीसाठी ठाम लढा

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पळस्पे जिल्हा परिषद मतदारसंघातील जनतेला गेल्या अनेक वर्षांपासून भीषण पाणीटंचाई, पावसाळी पुरांचे संकट, नदी प्रदूषण, घनकचरा आणि गटार सांडपाण्याच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. प्रशासन व लोकप्रतिनिधींच्या उदासीनतेमुळे हे प्रश्न आजतागायत प्रलंबित राहिले असून, नागरिकांचे आरोग्य, जीवनमान व सुरक्षितता धोक्यात आली आहे. या अन्यायकारक परिस्थितीविरोधात ठाम संघर्ष उभारण्याच्या निर्धाराने पळस्पे मतदारसंघात उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले आहेत.

पावसाळ्यात पळस्पे परिसरात पुराचे पाणी थेट घरांमध्ये घुसते, रस्ते जलमय होतात आणि नागरिक अक्षरशः अडकून पडतात. दुसरीकडे उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्यासाठी महिलांना व नागरिकांना वणवण करावी लागते. नदी व नाल्यांमध्ये सोडले जाणारे दूषित सांडपाणी आणि औद्योगिक प्रदूषणामुळे पाणी विषारी बनले असून आजारांचे प्रमाण वाढत आहे. घनकचरा व्यवस्थापन पूर्णपणे कोलमडले असून, संपूर्ण परिसर दुर्गंधी व रोगराईच्या विळख्यात सापडला आहे.

या पार्श्वभूमीवर पळस्पे गटातून जिल्हा परिषद सदस्य पदासाठी अस्मिता अनिल ढवळे, पळस्पे पंचायत समिती गणातून विक्रांत नारायण घरत आणि एकोण पंचायत समिती गणातून श्रीमती शर्मिला परशुराम माळी यांनी जनतेच्या प्रश्नांसाठी थेट संघर्ष करण्याची भूमिका घेत निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. उमेदवारी अर्ज दाखल करताना हा केवळ राजकीय सोहळा न ठेवता, हंड्या आणि पाण्याच्या बाटल्या हातात घेऊन पळस्पेतील खरी परिस्थिती प्रशासनाच्या आणि सत्ताधाऱ्यांच्या डोळ्यात अंजन घालण्याचा प्रयत्न करण्यात आला.

२० फेब्रुवारीनंतर एमआयडीसी व एमजीपीच्या विरोधात उपोषणाचा इशारा देत पाणीपुरवठा, सांडपाणी आणि घनकचऱ्याच्या प्रश्नांवर ठोस निर्णय होईपर्यंत माघार न घेण्याचा निर्धार उमेदवारांनी व्यक्त केला आहे. ‘‘सांडपाणी व कचरा-मुक्त गाव’’ ही पळस्पेची नवी ओळख निर्माण करण्यासाठी जनतेने आमच्या पाठीशी उभे राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

## रोह्यात शेकापकडून नवे चेहरे

### कार्यकर्त्यांकडून ‘लाल बावटे की जय’चा नारा



**। चणेरा । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शेतकरी कामगार पक्षाच्या उमेदवारांनी ‘लाल बावटे की जय’च्या घोषणेत उत्साहात उमेदवारी अर्ज दाखल केले. या निवडणुकीत शेतकरी कामगार पक्षाने सक्षम, उच्चशिक्षित व सामाजिक कार्यात सक्रिय अशा नव्या चेहऱ्यांना संधी दिली आहे.

शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने उमेदवारी अर्ज दाखल केलेले उमेदवार मुंबई उच्च न्यायालयात वकील, डॉक्टर, बी.ए., बी.एड. शिक्षण घेतलेले असून, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य व राजकीय क्षेत्रात कार्यरत आहेत. शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी रोहा तालुक्यातील चार जिल्हा परिषद गट व आठ पंचायत समिती गणांमध्ये नव्या चेहऱ्यांना संधी दिली आहे. त्यामुळे मतदार निश्चितच या उमेदवारांना विजयी करतील, असा विश्वास उमेदवारांनी व्यक्त केला आहे. रायगड जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद गटांसाठी भुवनेश्वर गटातून गणेश कृष्णा मढवी, आंबेवाडी गटातून प्रतीक्षा शिरीष महाबळे व साक्षी अशोक घावटे, घोसाळे गटातून रूपाली गणेश मढवी व वैष्णवी हेमंत ठाकूर, तसेच नागोठणे गटातून ॲड. रोशन पाटील यांनी उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे दाखल केले आहेत. पंचायत समितीच्या आठ गणांसाठी भुवनेश्वर गणातून खेळू ढमाळ, धाटाव गणातून दर्शना समीर खरिवले, आंबेवाडी गणातून मारुती खांडेकर, शिवराम महाबळे व मनोहर महाबळे, कोलाड गणातून साक्षी अशोक घावटे, घोसाळे गणातून शंकर दिवकर व विनायक धामणे, न्हावे गणातून रूपाली गणेश मढवी व सागरी राजेंद्र मळेकर, तसेच नागोठणे गणातून कांचन माळी, सुषमा दिवकर आणि सुकेळी गणातूनही पंचायत समितीच्या जागेसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले आहेत.

पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ज्येष्ठ नेते शंकरराव म्हसकर, आर.डी.सी. बँक संचालक गणेश मढवी, तालुका चिटणीस शिवराम महाबळे, मजदूर फेडरेशन अध्यक्ष हेमंत ठाकूर यांच्या उपस्थितीत ‘‘लाल बावटे की जय’’च्या घोषणेत हे उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले.

यावेळी कार्यलयीन चिटणीस संदेश विचारे, जिल्हा चिटणीस मंडळ सदस्य विनायक धामणे, मारुती खांडेकर, तुकाराम खांडेकर, विठल मोरे, बाळाराम धामणसे, रोहा शहर चिटणीस गणेश महाकाळ, विविध कार्यकारी सोसायटी चेअरमन गोपीनाथ गंभे, व्हा. चेअरमन विकास तांडेल, पुरोगामी युवक संघटना अध्यक्ष संतोष दिवकर, उपाध्यक्ष अमोल शिंगरे, विभागीय चिटणीस शंकर दिवकर, महिला आघाडी प्रतिनिधी कांचन माळी, विभागीय चिटणीस अरविंद भिलारे, प्रवीण जांभेकर, लीलाधर मोरे, महादेवखार सरपंच संकेत जोशी, कामगार आघाडी अध्यक्ष राजेंद्र मळेकर, राम महाडिक, धनाजी लोखंडे यांच्यासह असंख्य कार्यकर्ते व महिला कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## वासांबे जिल्हा परिषद गटात महाविकास आघाडीकडून जल्लोष



**। रसायनी । प्रतिनिधी ।**

वासांबे जिल्हा परिषद गटात महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवारांनी मोठ्या उत्साहात व जोरदार शक्तिप्रदर्शन करत आपले उमेदवारी अर्ज अधिकृतरित्या दाखल केले. या शक्तिप्रदर्शनामुळे संपूर्ण वासांबे परिसर निवडणूकमय वातावरणाने भारावून गेला. महाविकास आघाडीत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), उबाठा शिवसेना, शेतकरी कामगार पक्ष, मनसे तसेच वंचित बहुजन आघाडी या घटक पक्षांचा समावेश आहे.

उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी महाविकास आघाडीचे उमेदवार, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शेकडो चारचाकी वाहनांचा भव्य ताफा काढत वासांबे परिसरात प्रभावी शक्तिप्रदर्शन केले. यावेळी नवसाला पावणारी टाकेदेवी माता येथे खोबऱ्याने ओटी भरून येणाऱ्या निवडणुकीत विजयासाठी देवीकडे साकडे घालण्यात आले व आशीर्वाद घेण्यात आला. यानंतर वाहनांचा ताफा खालापूरच्या दिशेने रवाना झाला. खालापूर फाटा येथून ढोल-ताशांच्या गजरात उमेदवार व कार्यकर्ते पंचायत समिती कार्यालयात दाखल झाले. यावेळी परिसरात उत्साहाचे व जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले होते.

या कार्यक्रमास आमदार अनिकेत तटकरे, काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, उबाठा शिवसेनेचे उपजिल्हा प्रमुख नितीन सावत, खालापूर तालुका अध्यक्ष एकनाथ पिगळे यांच्यासह महाविकास आघाडीचे अनेक प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी वासांबे जिल्हा परिषद सदस्य पदासाठी संदीप सुदाम मुंढे, वासांबे पंचायत समिती सदस्य पदासाठी रोशन राऊत, तर रिस पंचायत समिती सदस्य पदासाठी निखिल नरेंद्र डवळे यांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे उमेदवारी अर्ज अधिकृतपणे दाखल केले.

## आदई पंचायत संघातून विलास फडकेंना उमेदवारी



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल तालुक्यातील आदई पंचायत मतदार संघातून रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य विलास फडके यांनी आपला उमेदवारी अर्ज पनवेल तहसील कार्यालयात भरला. याच वेळी नेरे जिल्हा परिषद मतदार संघातून मारुती बाळा भस्मा यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. तर नेरे पंचायत समिती मतदार संघातून हेमा धर्मा वाघ यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. उमेदवारी अर्ज दाखल करताना माजी आ. बाळाराम पाटील, पनवेल विधानसभेचे अध्यक्ष आणि माजी सभापती काशिनाथ पाटील, नारायण घरत, शेकापचे तालुका चिटणीस राजेश केणी आदी मान्यवर उपस्थित होते. सकाळी ११ वाजता पनवेल येथील शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यालयातून जोरदार रॅली काढून उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला. यावेळी कार्यकर्ते उपस्थित होते.

## दादर, जिते गणात शेकापचे उमेदवार सज्ज



**। पेण । प्रतिनिधी ।**

गेली कित्येक महिने शेतकरी कामगार पक्ष संपला म्हणणाऱ्यांच्या तोंडात जोरदार चपराक पेण तालुक्याचे चिटणीस प्रल्हाद पाटील यांनी दिली आहे. उमेदवारी अर्ज भरण्याच्या बुधवारी शेवटच्या दिवशी शेतकरी कामगार पक्षाच्या समर्थकांच्या बरोबर दादर गणातून प्रल्हाद पाटील, आणि जिते गणातून मोहिनी मोरे यांनी उमेदवारी अर्ज भरला आहे.

पेण तालुका म्हणजे शेतकरी कामगार पक्षाचे बालेकिल्ला म्हणून संबोधले जात होते. मधल्या काळात पक्षातील काही नेत्यांनी इतर पक्षात प्रवेश केल्याने काही मंडळी वलगना करत होते की, शेतकरी कामगार पक्ष संपला. परंतु, प्रल्हाद पाटील यांनी नव्याने शेतकरी कामगार पक्षाची मोट बांधून पेण तालुक्यातील जिते, दादर, वडखळ गणामध्ये जिल्हा परिषदेच्या व पंचायत समितीचे उमेदवारी अर्ज भरले आहेत. २० जानेवारी रोजी संजय जांभळे यांनी वडखळ गटातून आपला उमेदवारी अर्ज भरला होता. तर, २१ जानेवारी रोजी मोहिनी मोरे आणि स्वतः प्रल्हाद पाटील यांनी आपल्या समर्थकांसह येऊन उमेदवारी अर्ज भरला आहे. शेतकरी कामगार पक्षाचे समर्थक गळ्यात लाल बावटा बांधून घोषणा देत प्रांत कार्यालयावर आले. एकंदरीत, जिल्हा परिषदेच्या निवडणुकीमध्ये विरोधकांना कडवी झुंज देण्यासाठी सज्ज झाले असून, शेतकरी कामगार पक्ष संपला म्हणून बोलणाऱ्यांची बोलती बंद केली आहे.

## अनिता डांगरकर यांना उमेदवारी



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल तालुक्यातील आदई पंचायत समितीच्या निवडणुकीत शिवसेना ठाकरे गटाकडून अनिता साईनाथ डांगरकर यांनी अर्ज दाखल केला आहे. निवडणूक निर्णय अधिकारी पवन चांडक यांच्याकडे त्यांनी बुधवारी दाखल केला.

## उरण, पनवेलमध्ये आघाडीच्या उमेदवारांचे अर्ज दाखल



**। उरण । प्रतिनिधी ।**

काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष तथा कामगार नेते महेंद्र घरत महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या मागे खंबीरपणे उभे आहेत. बुधवारी त्यांनी पनवेल, उरणमध्ये पंचायत समिती आणि जिल्हा परिषद उमेदवारांचे अर्ज दाखल केले.

उरणमध्ये प्रचंड असंतोष आहे. दिबांचे नाव अद्यापही विमानतळाला दिले गेले नाही. पाणीसमस्याही गंभीर आहे. रस्त्यांचा प्रश्न बिकट आहे, त्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. मैदानांचा प्रश्न गंभीर आहे. त्यामुळे उरण, पनवेलच्या जनतेचा कौल महाविकास आघाडीच्या उमेदवारांना मिळेल, असा विश्वास महेंद्र घरत यांनी व्यक्त केला.

यावेळी माजी आमदार मनोहर भोईर, बाळाराम पाटील, उरणच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष भावना घाणेकर, वसंत काठावले, नंदराज मुंगाजी, मुरलीधर ठाकूर आणि काँग्रेसचे शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.









कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)